Lanka Siva Rama Prasad's

# THE CASKET OF VERMILION

# दिव्य करंडा



Translated by:

नारायण मध्वाचार्य मुदगलकर

सौ. निलिमा नारायण मुदगलकर

Art by Apoorva Lanka

Lanka Siva Rama Prasad's

# THE CASKET OF VERMILION

# दिव्य करंडा

## लेखक परिचय

## About the Translator



**नारायण मध्वाचार्य मुदगलकर**

शिक्षण - B.Sc. (Maths)
संस्कृत पारंपरिक पद्धतीने
नोकरी - भारतीय स्टेट बँक
कार्य - माध्वतत्त्वज्ञान प्रचार प्रसार



**सौ. निलिमा नारायण मुदगलकर**

शिक्षण - B.A. मराठी, संस्कृत B.Ed.
संस्कृत अध्यापन
कार्य - मराठी स्फुट लेखन
अनुवाद - राघवेंद्र स्तोत्र, प्रल्हाद चरित्र
गोपीगीत, वेंकटेश महात्म्य
आगामी - राघवेंद्र स्वामी चरित्र ओवीबद्ध



Poetry by Dr Lanka Siva Rama Prasad



Art by Apoorva Lanka

March 2018. All rights reserved.Copyright @ 2018
by Dr. Lanka Siva Rama Prasad
Head of the Department
Cardiothoracic & Vascular Surgery
Prathima Institute of Medical Sciences
Nagunur Road, Karimnagar - 505 417, Telangana.

Published by:
Dr. Lanka Siva Rama Prasad
Srijana Lokam / Writer's Corner
Prasanthi Hospital
Sivanagar, WARANGAL-506 002,
Telangana, INDIA
Mobile : 8897849442
Email: lankasrprasad@gmail.com
www.anuvaadham.com

## लेखक परिचय

**नारायण मध्वाचार्य मुदगलकर**

शिक्षण - B.Sc. (Maths)
संस्कृत पारंपरिक पद्धतीने
नोकरी - भारतीय स्टेट बँक
कार्य - माध्वतत्त्वज्ञान प्रचार प्रसार

सौ. निलिमा नारायण मुदगलकर

शिक्षण - B.A. मराठी, संस्कृत B.Ed.
संस्कृत अध्यापन
कार्य - मराठी स्फुट लेखन
अनुवाद - राघवेंद्र स्तोत्र, प्रल्हाद चरित्र
गोपीगीत, वेंकटेश महात्म्य
आगामी - राघवेंद्र स्वामी चरित्र ओवीबद्ध

# INDEX

१ समक्काचा क्रोध
२ अरण्यरुदन
३ स्वप्न
४ मोती संस्काराचे
५ पर्जन्य धरेचे मीलन
६ राजकीय युद्धाची चाहूल
७ चांदण गाणी
८ मृत्यूचे सावट
९ समाधी वन
१० दैवाचा गूढ कौल
११ आभास अद्भुताचा
१२ परतीचा प्रवास
१३ निद्रा की सुषुप्ती
१४ विषाग्नी
१५ समर्थ नेतृत्व
१६ युद्धपश्चात
१७ वरंगल दरबारी
१८ कसोटी धैर्याची
१९ भव्य राजधानी वरंगल
२० सुखाची चाहुल
२१ हा खेळ सुखदुःखाचा
२२ युद्धाची ठिणगी
२३ युद्धाचा थरार
२४ दिव्य करंडा

# १
# समक्काचा क्रोध




होती ती आदिवासी मूलनिवासी बाला । धारण करिते राजकुमारी समक्का नावाला ।।
काळी त्या निसर्ग बहु कोपला। करी सामना आदिवासी ते दुष्काळाला ।।
समयी अशा बोले शक्तिमान काकतीय राजा। आदिवासी तुम्ही कर द्या मम साम्राज्या।
न देता कर हल्ला त्याने केला। कर्तव्य नृपाचे तेव्हा तो विसरला ।।
रक्तरंजित पाहुनि निजपुत्रांना। क्रोधाने सांगे समक्का साऱ्यांना ।।
अहंकार नृपाचा आडवा आला । मम पुत्रांना यमद्वारी घेऊनि गेला ।।
होते ते कष्टकरी दारिद्र्ये बहु गांजले । दुष्काळाने होते ते अति व्याकुळलेले ।।
हे नृपा तुम्हीच आमुचे पालनहार । गांजलो आम्ही दुष्काळाने माफ करावा कर ।।
साऱ्यांनी बहु काकुळतेने तयासी विनविले । परी अहंकारी नृपाने तात्काळ त्या फेटाळिले ।।
तदा राजाने निज सैन्या आज्ञापिले । तत्परतेने सैन्याने हल्ले बहु चढविले ।।
कष्टकरी ते आदिवासी भिडले सैन्याला । अन्यायाविरुद्ध करू लागले तेव्हा संघर्षाला।।
कुशीत घेऊनि दगडधोंड्यांना गोदामाय पहुडली । शुष्क परी ती मूक रूदन करू लागली ।।
ढग दिसेना नभी कुठे निसर्ग कसा कोपला । तेजाने आपुल्या सूर्य आग ओकू लागला ।।
हतबल सारे शरण जाती सरदाराला । वृद्ध जाणत्यांनी कथन केले तेव्हा परिस्थितीला ।।
सूर्य कोपला ढगही रुसला गेला दूर पळून । दुष्काळाने आमुचे सारे जीवन गेले व्यापून ।।
अन्न नसे खाण्याला नसे पाणी पिण्याला । सांगा सरदार आम्ही द्यावे कसे कराला ।।
सांगू नका सबबी नका सांगू कारणे । कर्तव्य तुमचे श्रेष्ठ नित्य तुम्ही कर भरणे ।।
सरदार गरजला त्वेषाने त्या पित्या समान वृद्धाला । सोबत्यांनी तेव्हा लाविली वृद्धाच्या तलवार मानेला ।।
सचिंत वृद्ध तो सुचेना तयाला काहीच त्या क्षणी । जावे तुम्ही सत्वर आता येथुनि जीवंतपणी।।
पाहुनि कृती सरदाराची वृद्ध जाई भांबावूनि । न थांबला क्षण सत्वर तेथुनि गेला तो निघुनि ।।
येता तांड्यावरी तो बैसला खाली झणी । वृत्तांत कथिला त्याने तेव्हा अश्रूपूर्ण नेत्रांनी ।।
जमले सारे समुदायी ते सारे एकजुटीने । युद्ध असे अटळ आता लढू सारे धैर्याने ।।
नका घेऊ विश्रांती क्षणही कामाला लागा जोमाने । नका जाऊ खचून तुम्ही अशा संकटाने ।।
परजून ठेवा हत्यारे अन् सज्ज करा धनुष्य । तरुण तरुणांनो शिकून घ्या तुम्ही युद्धाचे कौशल्य ।
ऐकता वचन सरदाराचे समक्का बोले त्यावरी । विचार करावा दुसरा काही युद्ध नच पर्याय यावरी ।।
अंतिम तुमचा असेल जरी हा निर्णय खरोखरी । तयार आम्ही युद्धाला हो वय असेल सान तरी ।।
सरदार आपला हुषार अनुभवी आहे एक पुजारी । अपमान करी राजा याचा भरल्या त्या दरबारी ।।
पितामह माझे मेदराज ते आले आश्रयाला । मेदारम गावी हेच आजोबा धावून ये मदतीला ।।
समक्काचा पिता सांगे वृत्तांत तो कन्येला । यांनीच मजला जंगलामध्ये आणिले आश्रयाला ।
रीतभात अन् नीतिनियम ते सारे जंगलाचे । त्यांनीच दिधले धडे मजला दिले ज्ञान शिकारीचे ।।
वृत्तांत तो जधि जाणिला सारा समक्काने । क्रोधित झाली ती बाला नृपाच्या त्या वर्तनाने ।।
वेदनेने त्रस्त मुले ती होती आदिवासी । समक्का होय दुःखित तेव्हा पाहुनिया वेदनेसी ।।

# २ अरण्यरुदन




माघमासी या पिठूर चांदणे शीतल छाया दाट । वाग्देवी सरस्वती प्रकटे आम्हा दावण्या वाट ।।
सूर्य चालला उत्तरदिशी रथातूनि त्याच्या । भीष्म पितामह बघा चालले मार्गे निर्वाणाच्या ।।
निरव शांतता तीव्र पसरली वाघिण आक्रोशली । चिरत गेला ध्वनी तिचा तो का ती ओरडली ।।
कुठे असतील बाळे माझी कुणी काय केले? व्याघ्राने का कुणी तयावर हल्ले न च केले ।।
वनी त्या क्षणी स्वर ये कानी बाल रुदनाचे । घ्या हाती ढोल ताशे काठ्या अन् भाले ।।
चला बघू या अशा अवेळी रुदन कोणी केले । आम्ही निघालो सावधतेने हृदय कंपित झाले ।।
वारुळ पडले दृष्टी आमुच्या एका वृक्षाखाली । तिथे आम्हाला  तेजाची ती किरणे जाणवली।।
भोवती तिथे फिरत होते बछडे वाघाचे । आम्ही टाकिले त्याच्यावरी की झोत प्रकाशाचे ।।
क्षणभर टाकून दृष्टी तेव्हा आम्हाकडे पाहिले । बछडे सारे त्याच क्षणी की वनी पळून गेले ।।
शिरी तुझ्यावरी धरिली छाया होती नागाने । आम्ही विनविले तयास तेव्हा झणी प्रार्थनेने ।।
चंद्रप्रकाशी निघून गेला नागराज तो परम संतोषाने । उत्तम वस्त्रे झाकून तुजला आणिले घरी आनंदाने
सुखे सारी हात जोडूनि आम्हापुढे होती । परी नव्हती झाली दुर्दैवाने आम्हा अपत्यप्राप्ती।।
प्रसाद दिधला भगवंताने असे आम्हा वाटले । परम संतोषे आम्ही तेव्हा तुजसी स्वीकारले ।।
मेघराजू ते तुला शिकविले विद्या कौशल्याते । टाकून तुजसी अकालीच तो गेला सोडून साऱ्याते ।।
सुंदर तू बुद्धिमान ही चपळ जशी हरिणी । हर्षित करिसी साऱ्यांना तू आपुल्या कलागुणांनी ।
उड्या मारणे गाणे धावणे पोहणे अन् झगडणे । सारे आम्ही पाहत होतो तुला अतीव आनंदाने ।।
धनुष्यबाण ते लिलया पेलले तू निज कराने । पाहुन तुजला चोर लुटारू कापे तीव्र भयाने ।।
पशु पक्षी अन् मनुष्य सारे प्रेमात तुझ्या पडले । जंगलातील रीती साऱ्या तुजकडूनच शिकले ।।
आम्ही दिधले तेव्हा तुजला समक्का नावाला । तूच आणिले जीवनी आमुच्या सुख नि आनंदाला ।।

# ३
# स्वप्न



फुलू लागली, ती समक्का, अन् तारुण्य ते बहरले । न कळले, कधी कसे हे, फूल कळीचे झाले ।।
वृक्ष वेली अन्, सुमनांसंगे किती कशी बागडली । अल्लड होती, आता आता ही, कुणी जादू केली ।।
दिवस रोजचा, उत्सव जणु की तिच्यासवे सजला । नृत्य गीत अन् आनंदाने, दिवस कसा सरला ।।
उत्सव करिती, किती कोणते, ही आदि जमात । अति हर्षाने जमूनि सारे, नृत्य गीत गात ।।
माघमासीच्या थंडीने का शाल हळू पांघरली । धुंद या क्षणी मिळून आम्ही, प्रार्थना ती केली ।।
देवता ती पर्जन्याची, इंद्र अन् शची असे । वेध लागले आम्हा साऱ्यांना आता विवाहाचे ।।
मूर्ती करूनि सुबक मातीच्या, त्या अशा सजविती । तालावर ती संगीताच्या, नृत्य सारे करिती ।।
विवाह करूनि उभयतांचा ते, सारे आता प्रार्थिती । पडू दे पाऊस असा छान की सारे आनंदती ।।
भरून जाऊ दे, नदी तलाव आता, तुडुंब पाण्याने । दूर जाऊ दे, दुःख दैन्य ते, तव आशीषाने ।।
पडता पाऊस, तृप्त धरा बघा, कशी ओलावली । बीज महोत्सव करू आता हो, शेते तरारली ।।
आशीष घेऊ, भूमातेचा करू तिची प्रार्थना । कृपा असावी, नित्य आम्हावरी, हीच मनी कामना ।।
प्रसन्न होऊन, भूमातेने, कसे दान दिधले । बघा कसे हो,  किती टोपले, फळा फुलांनी भरले ।।
चला जाऊ या, बाजाराला, विक्री करू या त्यांची । मिळवू मग, विपुल धनाला, नच उणीव कशाची ।।
येता उत्सव, ताडपर्णचा, करू फुले गोळा । दसऱ्याला मग नवीन भात अन, आनंदी सोहळा ।।
सिकुडू उत्सव आला आता हो, चंगळ भाज्यांची। मर्का उत्सव आंब्याचा हा, ये साद वसंताची ।।
चला जाऊ या दाट अरण्यी, आणू कंदमुळे । चिंच, हरबरे, पालेभाज्या, जांभळीची फळे ।।
डाळिंब, आवळा, तेंदूपाने, मुळा आणि पान । भात, चना, ज्वारी, आंबे फणसही आणू छान ।।
हीच आपली, संपत्ती हो, करून आणू गोळा । देईल मग ती, विपुल पैसा जाता बाजाराला ।।
हाती येता पैसा अडका, हौस करू आपली । जगू क्षण हा, आनंदाने, कृपा देवाची झाली ।।
साऱ्यांनी मग एके दिवशी, वाजविले वाद्यांना । जंगल देवी, भूदेवी, झंकारादेवी, जागविले साऱ्यांना ।।
पर्जन्यदेवता, पूजिता तयांनी, कृपादृष्टी झाली । येता जेव्हा, जलधारा त्या झाडे मोहरली ।।
गायन करूनि, नृत्य करिती, सारे तयासमोरी । पिऊनि वारुणि , सान थोर ते, नाचती हर्षभरी ।।

# ३
# स्वप्न




नृत्य सोहळा, जेव्हा सरला, अर्ध्या त्या रातीला । समक्का ती, घरी जाऊनि, घेई कुशीत निद्रेला ।।
निद्रेच्या त्या कुशीत शिरता, काय नवल घडले । स्वप्न पडले, कसले तिजला काय कसे दिसले ।।
चालत असता, झऱ्यासंगती, कोण कुठे भेटले । स्वप्न की सत्य दोहोमधले अंतर ते मिटले ।।
ल्याला मुखवटा कोणी कुठला चाल करून येई । शिकारीही श्वानासंगे इकडे तिकडे पाही ।।
चाल करूनि येती सारे, चहुबाजुंनी त्वेषाने । परतुन लावी, त्या हल्ल्याला समक्का अती धैर्याने ।।
करून सुटका त्यांच्यापासून, गावाकडे निघाली । समक्कावरी, पुन्हा तयांनी, हल्ला केला भारी ।
त्याच वेळी अवचित येऊनि, व्याघ्र उभा सामोरी । स्वप्नी आला त्याचवेळी हो शुर योद्धा भारी।।
परतुन लावी, हल्ला तेव्हा त्या साऱ्या लोकांचा । अर्थ काय तो, तिला कळेना, त्या साऱ्या घटनेचा ।।
तोल जाऊनि, पडली खाली, दगडावर युवती । सडा फुलांचा पडला होता, किंशुक वृक्षा खालती ।।
सुस्मित वदने, कोणी येऊन जल दिले पिण्याला । कमल पत्रातुनि आणिले होते करि त्याने जलाला ।।
मूर्च्छा येऊनि, पडली म्हणूनि, जल त्याने शिंपडले । कमलपात्री, भरूनि त्याने, जे होते आणिले ।।
स्पर्श जलाचा होता, येई तेव्हा बाला शुद्धीवरी । कुणी टाकिले, उष्ण रुधिर हे, मम कायेवरी ।।
भयकंपित ती बाला, जधि जागृत की झाली । आई म्हणुनि उच्च स्वरे ती आर्त साद घाली ।।

## ४
## मोती संस्काराचे



काय बाई, आक्रित घडले, उमजेना मज काही। सांगू कुणाला, बोलू कुणाशी, कुणा ठाऊकी नाही ।।
अवचित का हो, ही वेल अशी फुलांनी मोहरली । कळले का तुज,कन्या माझी ऋतूमती झाली ।।
हे वृक्षांनो, हे वेलींनो, गुपित तुम्हा सांगते । पडले पाऊल, मम कन्येचे, आज यौवनाते ।
कंच फुलला, महुआ तो किंशुक बहरला । कात टाकिता, सर्पाचाही पुनर्जन्म झाला ।।
कातर होऊनि, जात सशाची, सैरभैर झाली । काय जाहले, म्हणुनि अशी ती, उगा बावरली ।।
हे मुलींनो, हे स्त्रियांनो, हाक मारिते तुम्हाला । कन्या माझी, वयात आली, अनाघ्रात बाला ।।
दृष्ट न लागो कोणाची हिजला, कुठे हिला ठेवू । वृद्ध स्त्रियांनो, चला हिला ग दूर अरण्यी नेऊ ।।
चला अरण्यी, बांधू आपण कुटी वनांतरी । गवत सुगंधी, बांबू कोमल हळूच पसरू त्यावरी ।।
निष्पाप ही बाला, राहील इथे सुखात । साऱ्यांपासूनि, दूर राहू दे, हिला दिवस सात ।।
जरा उंच भूमीपासूनि, वृक्षापासूनि दूर । फुला संगती, ठेवू हिजला, मन माझे अधीर ।।
होता ऋतूमती, स्पर्श न व्हावा, हिचा कुठे वृक्षास । स्पर्शिता हिने, झाडे वेली, कधी न ये, बहरास ।।
गुपित तुजला, आज सांगते, ठेव सारे ध्यानी । मीही यातून गेले होते, माझ्या नवयौवनी ।।
स्पंदने ती भावनांची, हृदयी तव झंकारती । क्षणोक्षणी, स्वप्ने मधुर ती, तुला खुणाविती ।।
वाटेल कधी तुज, गावे, नाचावे, आनंदाने । कधी तरी तूच बसशील, अशी उदास मनाने ।।
सृजनासाठी, योग्य आता तू, पूर्ण रूप झाली । फूल उमलता, कसे कळीचे, मनोमनी मोहरली ।।
सांगुनि गोष्टी, वृद्ध स्त्रियांनी, सारे समजाविले । दिवस सात ते, सरल्यानंतर, न्हाऊ तिला घातले ।।
नवे वस्त्र ते, तिजला देऊन, छान तिला सजविले । भेट घडविण्या, साऱ्यांची ती; वस्तीवरी आणिले ।।
नृत्यविभोर त्या, साऱ्या तरुणी, मद्यधुंद होता । पुलकित तारे, पुलकित वारे, नृत्य तयाचे पाहता ।।
अवचित अचानक, कोणी मुखिया, ये ग्रामांतरी । दिल्या विना कर, आम्ही न जाऊ आता माघारी ।।
नृत्य पाहता, क्षणभर त्याची, दृष्टी पडता तिकडे । अनिमिष नेत्री, पाहू लागला, नभी कधि, कधी तिच्याकडे ।।
कोण सुंदर? तो नभीचा, की हा मुखचंद्र? । परी तोही होता, त्याहून सुंदर, दुजा नभीचा चंद्र ।।
नृत्य करिती, मोहक साऱ्या, त्या शुभ्रवस्त्रांकिता । छिन्न हृदयी, होऊनिया तो, त्या बाला देखता ।।
उत्सवमूर्ती, हो समक्षा, नृत्य तिचे देखणे । फेर धरित, तिच्या संगती, साऱ्या उन्मुक्तपणे ।।
किती छटा त्या, नृत्यामधूनि, साऱ्या दाखविती । कधी शिकारी, कधी प्रणयिनी, धुंद त्या नाचती ।।
नृत्याभिनय, करिता साऱ्या, चांदणे नभी सरले । अवचित आला, कोण तरुण हा, स्वप्नी ज्या पाहिले ।।
राजकुमार हा माझ्या मनीचा, क्षणी मोहरले । बाहुपाशी या, अलगद घेता, गात्री थरारले ।।
भास असूनि, तेव्हा कशी ती, आनंदे मोहरली । किती काळ हा, सुखद, सुरम्य या, स्वप्नी पहुडली ।।

## ५
## पर्जन्य धरेचे मीलन



पाऊस आला, पहिला वहिला, धरा सुखावली । थेंब तयाचे, झेलुन अंगी, रोमरोमी फुलली ।।
अलगद शिरुनि कुशीत त्याच्या, जरा विसावली । धरा नव्हे ही, मीच असावे, गाली खुदकन हसली ।।
गंध फुलांचा, वाऱ्याने या, दूरवर नेला । प्रणय कसा हा, देहामधुनि, खोल खोल रुतला ।।
केव्हा शिरले, बाहुपाशी या, नकळे मज काही । मनी लाजुनि, बावरून ती इकडे तिकडे पाही ।।
दृष्टी देखता, जनकजननी, मनी जरा घाबरली । नजरेतुनिया, त्यांच्या तिजला, उत्सुकता दिसली ।।
दुलई घेऊन, दाट धुक्याची, रात्री ती पहुडली । कोंबड्याची बांग ऐकूनि, भल्या पहाटे उठली ।।
प्राचीवरती रंग गुलाबी , पहा कसे उधळले । लुप्त होऊनि चंद्रतारका, ढगाआड लपले ।।
नभी पहा कशी, शुभ्र ढगांची दाटी अहा जाहली । सौवर्णी किनार लेऊनि , नभांगणी शोभली।।
प्रभातीची चाहुल येता, पक्षी गाणी गाती । किलबिल करूनि, सृष्टी सारी, पहा कशी जागविती ।।
पुसू लागला, पित्यासी तो; तिचे क्षेमकुशल । आणि म्हणाला, परतून येईन, होऊनि भावविव्हल ।।
ऐकूनि सारे वर्तमान ते, मन तिचे अधीर । सांजसकाळी वाट पाहता, लागे कशी हुरहुर ।।
विवाह होईल, दोघांचा म्हणुनि, सारे आनंदले । धुंद होऊनि, तालावरती नृत्य करू लागले ।।
कन्या आमुचि, नव्हे वनाची, देऊ आम्ही तुला। वरुण पुत्र तू, तिला शोभतो, पाहू कौतुक सोहळा ।।
सार्थ करण्या, विवाह सोहळा, सज्ज सारे गोत । या नभीच्या मंडपाखाली, मदतनीस हे मेघ ।।
उंच पर्वती, आसनावरी, बसतील गणगोत । वृक्ष सारे, असतील तत्पर, त्यांच्या सेवेत ।।
थंडीच्या त्या तालावरती, नृत्य करील मयूर । मंद वारे, छेडतील की, वाद्य गोड सुषीर ।।
किती फुलांनी, आसमंत हा, सुगंधित केला । उणे न काही, आता माझिया, कन्येच्या भाग्याला ।।
अबलख वारू, सज्ज उभा हा, कसा दिमाखदार । नवरदेव हा ऐटीत बसला, पहा त्यावर ।।
वऱ्हाड येई, त्याच्या मागुन, गाड्या शृंगारून । वरपक्षाचे स्वागत करिती, सारे आनंदुन ।।
भात, बाजरी, ज्वारी, धान्ये गायी अन् दागिने । मदिरा ही, आणली होती हुंडा म्हणुनि त्याने ।।
नाचु गाऊ, धुंद होऊनि, स्वागत करूया त्याचे । मद्य मदिरा, ओघ अखंडित, दिस हे आनंदाचे ।।
उत्सवमूर्ती, युवराज्ञी ही, सजली वधुवेषाते । मेण्यामाजी जाऊन बैसे, वाघीण, दुज्या रूपाते ।।
शुभ्र वेष तो, अंगी लेऊन, नवरदेव सजला । साऱ्यांना तो, त्याक्षणी तरी, व्याघ्र पहा भासला ।।
वंदन करुनि, कुलदेवीला, करू विवाह सोहळा । समक्का अन् पगडिड्डा राजू, विवाह यांचा सुवर्णाक्षरे लिहिला।।
सुमनांचा हा गंध धुंद हो, पसरे आसमंती । उत्सव चाले, दिवस तीन हा, नृत्यगीता सोबती ।।
दिव्य असा हा, विवाह सोहळा, आदिवासींचा खचित । पर्जन्याने कवेत घेता धरा हो पुलकित ।।

## ६
# राजकीय युद्धाची चाहूल



नाजूक सुंदर अशी समक्का, उंच रांगडा वर । कोमल वेली, जशी शोभते, विशाल वृक्षावर ।।
क्षण आनंदाचा, परी त्यासी दुःखाची किनार । राज्यावरती होते सावट, युद्धाचे निरंतर ।।
कधीहोईल, युद्ध सुरू ते, कोणा नसे माहीत । प्रजा सारी, याच कारणे होतसे भयभीत ।।
वरंगल ती, होय तयांची भव्य राजधानी । निर्मिली होती, ती तयांनी, एकशीलेतूनि।
नृप ते बेटा प्रोला, प्रथम द्वितीय रुद्रदेवा तद्नंतर । महादेवा, गणपतीदेवा, होते धैर्य धुरंधर ।।
रुद्रम्मा राणी होती, धैर्यशील अन् शूर । नातू तिचा प्रतापदेवा, येई राज्यावर ।।
राज्य होते, अस्थिर तेव्हा, नित्य लढाया चाले । युद्ध त्यांच्या, होते जणु, पाचवीला पुजले ।।
देवी काकती, कुलदेवता ही राजे करी पूजन । होऊनि नत चरणी तियेच्या घेती नित दर्शन ।।
स्थापुनी नगरी, वरंगल ती रुद्रदेव राजाने । वैभव आणिले चरणाशी, निज पराक्रमाने ।।
विजय स्तंभ तो उंच रोविला, गणपती देवाने । देवी काकती, मंदिर निर्मिले, त्याने श्रद्धेने ।।
कन्या त्याची, रुद्रम्मा ती राज्य करी निष्ठेने। प्रजा सारी, राहत होती, तेव्हा अतीव सुखाने ।।
सुलतान दिल्लीचे उपद्रवी बहु, होते सीमेवरी । भीतीच्या छायेत, वसतसे, नित्य प्रजा सारी ।।
प्रतापरुद्रदेव तो, नृप होता, युद्धनिपुण । शत्रूपासून करीत असे निज प्रजा रक्षण ।।
अल्लाउद्दीन खिलजी, होता, नृप दिल्लीस्थित । भारतभूला करीन काबीज, कांक्षा क्षूद्र मनात ।।
सुटे न कोणी, सुंदर तरुणी, त्याच्या नजरेतूनि । आसुरी आनंद, होत तयासी, त्यांच्या वेदनेतुनी ।।
दिल्ली वरूनि दृष्टी त्याची, दक्षिणेस की वळली जेव्हा । त्या राज्यांची, संपद सत्ता, मिळविन मी केव्हा ।।
देवगिरी येता हाता, मत्त तो जाहला । वरंगलच्या साम्राज्यी  चढवीन आता हल्ला ।।
प्रतापदेव तो द्वेषी जेव्हा, अंबादेव कुटुंबाते । वाटे त्यांसी तेच होय की कारण आजीच्या मृत्युते ।।
उभारण्या सैन्य, नड त्यासी, होती पैशाची । चिंता त्यासी, एकच होती सीमा रक्षण्याची ।।
मंत्री सारे, चतुर त्याचे सैनिकही शूर । शत्रु होता भारी त्यांचा करी हल्ले वारंवार ।।
मंगोल ते हल्ले करिती, उत्तर बाजूने । खेडीपाडी, विध्वंसिती ते, येऊन टोळीने ।।
अल्लाउद्दीन, हल्ला करूनि, त्यांना पिटाळिती । हल्ला चढवून स्वतःच आता लोकांना मारिती ।।
पुत्र मारिले, अनेक त्याने, त्यांच्या मातेसमोरी । नाचून त्या प्रेतावरती बिकट हास्य करी ।।
सीमा सारी क्रौर्याची, त्याने आलांडली । मनी लोकांच्या तेव्हा बहु भीती बसली ।।
रुद्रदेव तो राज्य करी, जेव्हा घटना साऱ्या घडल्या । भूमीपुत्र ते, आगतिक तेव्हा, लोकांनी ज्या पाहिल्या ।।
प्रार्थू लागले, ते ईशाला, करूनिया नमन । देवा आम्हा, सोडव आता या संकटातून
माहित नव्हते तेव्हा त्यांना कधी येईल मरण । चालत होते तरीही ते अश्रू भरले नयन ।।

## ७
## चांदण गाणी



पुनव राती या, चंद्रासंगे चांदण फुले विखुरली । अलगद घेऊन, मुठीत कुणी ही धरेवरी उधळली ।।
त्याच फुलांचा सुगंध घेऊनि मोहफुले बहरली । गंध तयांचा अंगी लेऊनि अवनी मोहरली ।।
धुंद होऊनि प्रेमी युगुल ते विहरे रानीवनी । समक्काला ते क्षणी किती स्फुरली गाणी।।
गाण्यातुनि या तिने वर्णिले उत्सव आनंदाचे । चंद्रालाच सांगे ती, गूज तिच्या मनीचे ।।
ज्येष्ठ मासी आम्ही आमुची शेते नांगरून ठेवू । आषाढ मासी ओल्या माती रोपलावणी करू ।।
श्रावणमासी हर्ष मानसी बहु झाला । करू साठवण मुळे, खोडे, पाने, औषधी वनस्पतीला ।।
भाद्रपद मासी करिता वंदन वृक्षदेवतेला । नवीन भाजी घरी आणुनि अर्पू देवाला ।।
अश्विन मासी कापणीला रोपे येती भाताची । घरी आणू त्यांना मग रास पडे धान्याची ।।
कार्तिक मासी सण शेंगांचा उत्सव करू त्याचा । शेतालागी कुंपण घालू नको त्रास प्राण्यांचा ।।
मार्गशीर्ष मासी करू साठवण तांदुळ मका धान्याची । चिंता नको मग सालभरही पोटापाण्याची ।।
पौंष मासी येतील जेव्हा डाळी अन् शिंदी गवत। साठवून ठेवू त्यासी आपण अती आनंदात ।।
माघ मासी वन मिरचीचे फुलेल किती छान । करू प्रार्थना वरूण देवाची त्यासी पूजून ।।
फाल्गुन मास येता मिळून सारे रानामध्ये जाऊ । मोहाची ती फुले सारी वेचूनिया आणू ।।
चैत्र मास येता चला जाऊ शिकारीला । नवी पालवी लेऊन अंगी वृक्ष पहा बहरला ।।
वैशाखात करू उत्सव बिज्जा सणाचा। करू गोळा पामरस तो क्षण आनंदाचा ।।
निसर्गाने दिले दान ते, समाधाने घेऊ । पूजन करूनि आता तयाचे नत चरणी होऊ ।।
त्या शीतल चांदण राती प्रणय तयांचा फुलला । वंशवेल ती बहरत होती निसर्ग तो सोबतीला ।।
आनंदाची मौजमजेची किती वर्षे सरली । तीन अपत्ये फुलासम ही संसारवेली फुलली ।।
सरलाक्का, नागुलम्मा, जंपन्ना बाळे ती खेळत । जीवनी तयांच्या नित्य सुखसुमने उधळित ।।
गीत संगीत, नृत्य निपुण ती शिकारही शिकली । समक्का राजु उभयता सुखातिशये समाधान पावली ।।
यौवन फुलता सरलक्काचे विवाह तियेचा करिती । योग्य वर तो गोविंदराजलु तिजसाठी नेमिती ।।
सुंदर कन्या अन् शूरवीर तो तिचा जोडीदार । कौतुक दृष्टी टाकुनि तयावर सुखी होय अपार ।।

## ८
## मृत्यूचे सावट




चिंब भिजलेले दिवस सुखाचे सरले कधी कळलेच नाही । सुखामागुनि कधी दुःख आले ते उमगलेच नाही ।।
अवर्षणाने त्रस्त सारे निसर्ग सारा कोपला । सुखाने जाताना हळूच दुःखाचा हात हाती दिला ।।
संकटाची चाहूल काहो लागली का घुबडाला । म्हणूनीच का या कीर्र रानी तो असा ओरडला ।।
काकदृष्टीला असेल दिसले का घडणारे विपरीत । म्हणूनीच का असा अवेळी बांबू ये बहरात ।।
माडांचा रस असा अवचित का आटला । लांडग्यांना ही असेल का संकटाचा चेहरा दिसला ।।
वैदु मांत्रिक त्रस्त सारे काय करावे आता । भीती दाटे मनात त्यांच्या तारील ती देवता ।।
जाऊ सारे शरण आपण आदिवासी देवीला । मांडूनि पूजा घेऊ करूनि प्रसन्न आता तिजला ।।
पूजा घालू आता तियेची विचार मनी केला । साक्षीने साऱ्यांच्या किती आकृती रेखिल्या ।।
हळदकुंकू वाहून त्यावरी टोपी शिरी घातली । मंत्र म्हणुनि मांत्रिकाने शक्ती ती जागविली।।
मारिले धोंड्यांनी  त्यासी अदृश्य शक्ती कल्पुनि । जाळण्या धूप, गुगुळ त्यांनी चेतविला अग्नी ।।
मांत्रिक तो घुमू लागला बोलू लागला काही । अवर्षण ते येईल आता अन्य मार्ग नाही ।।
नाद वाढता ताशांचा घुमू लागला मांत्रिक । पुढ्यात तो भूमातेच्या कोसळला अचानक ।।
मांत्रिकाचे बोल ऐकूनि संभ्रमात सारे । गात्रातुनिया लहर भीतीची अंगोपांगी पसरे ।।
कधी नव्हे ती मनामध्ये दाटे का हुरहूर । विचारांचे त्याचवेळी मनी उठे काहूर ।।
वृद्ध अम्मा गावातील ती मरणपंथा लागली । समक्क्का नि राजूला वार्ता कुणी पोचविली।।
लेक जावई पाहुनि नयन वृद्धेचे पाणावले । आशिष देऊनि नजरेने नेत्र तिने मिटले ।।
नवीन वस्त्रे ती आणुनिया पार्थिव ते झाकले । तेल हळद लावूनि तिजला स्नानासाठी नेले ।।
धन देऊनि मुठीत तिजला शवास ते उचलिले । वाद्यांच्या गजरात त्यासी अंतिम प्रवासास नेले ।।
किती गोडवे कर्तृत्वाचे लोकांनी तिच्या गायिले । आठव येता तिच्या गुणांचा नयन अश्रुंनी भरले ।।
और्ध्वदेहिक ते सारे करूनि तृप्त केले भोजने । सारे विधी पूर्ण केले साऱ्यांनी रुढी परंपरेने ।।
जाणुन घेऊ गुपीत आपण जे दडले भविष्योदरी । यास्तव तिघे जाऊ आपण पोपट टेकडीवरी ।।
मांत्रिकाचे बोल ऐकूनि विचार तो क्षणभरी । करूनि निघाले समक्का अन् राजू त्या टेकडीवरी ।।

# ९
# समाधी वन



जन्मला जो तो मृत्यु त्याचा निश्चित । न कळे मानवा सत्य हेच शाश्वत ।।
मृत्यूला ते समान सारे , नसे भेद काही । धनिक असो वा निर्धन, तिरडीवरूनि जाई ।।
न करी रे गर्व मानवा, अवनतीचे कारण । मी, माझे, व्यर्थ सारे सत्य हेच जाण ।।
काळोख गच्च पसरला, रातकिड्यांची किरकिर । शांत भयाण त्या राती सर्पांचे फुत्कार ।।
येता अंधारस्थळी भीती दाटली मनात । मांत्रिका संगे दोघे, होती भयाण रात ।।
आच्छादन ते वेलींचे गुहेवरी पसरले । जलही होते तिथेच जवळी प्रवाहले ।।
परिसर सारा भरून गेला कैक समाध्यांनी । चिरनिद्रा का असेल घेतली किती जीवांनी ।।
या कीर्रं राती पक्षी, माकडे, वटवाघुळे सोबतीला । आवाज त्यांचा चिरत जाई भेदून शांततेला ।।
कैक प्राणी, कैक पक्षी, वन्यजीवही संचरती मौजेने । शुक ही त्यांना साद देती आपुल्या ओरडण्याने ।।
गूढ टेकडी होती आदिवासींची खास । संकट येता मार्ग दाखवी होता विश्वास ।।
पूर्वज आपुले येती धावून संकट जेव्हा येते । मार्ग योग्य तो दाऊनि करी मार्गदर्शनाते ।।
मार्गे पुढती जाण्यासी राजू समक्का निघती । तेथेच थांबे मांत्रिक मात्र, संगे जाण्या नसे अनुमती ।।
सोमरस तो दिला प्यावया त्या उभयता । गुंगी येई क्षणचि त्यांना दिसू लागे मार्ग आता ।।
रान भरले काजव्यांनी रात्र होती अंधारी । दोघे निघती कीर्र राती त्या जावया गुहे भीतरी ।।
दाटी होती साप नि विचवांची, त्या मार्गावरी । क्षणोक्षणी वाटतसे मनी, मृत्यू उभा सामोरी ।।
सावध पावले टाकीत निघाली एकमेकासंगती । कुठून येई सुगंध ताजा, कुंकवाचा या भयाण राती ।।
दृष्टी टाकिता चोहीकडे, दिसला दिवा मिणमिणता । रक्त माखले मुख कोंबडीचे, नारळ, अन भीती मनी दाटता ।।
गुढ अंधारल्या क्षणी, सारे पडे दृष्टीला। आधाराने परस्परांच्या, सावरले स्वतःला ।।
वंशाची ती खूण होणी, एका स्तंभावरी। फडकत होता ध्वज एक, तेथेच त्यावरी ।।
दिसले धनुष्य त्यांना, भात्यात बाण दोन। जाता तिकडे ध्वनी उमटला थरारले मन ।।
हळदीचे मळवट भरल्या कपाळी कुंकू लाल ठळक । थरथरत्या गात्री उभी, समोर वृद्धा एक ।।
केस होते, विस्कटलेले, हाती आधारा काठी होती । शब्द तिचे पडता कानी दूर पळून गेली भीती ।।
हे जंगलच्या बाळांनो, का उशीर केला? करण्या प्रार्थना, तुम्ही कसे विसरला?
काय कारणे आज इथे पाऊल तुमचे पडले । आश्चर्य नको, आता, काय अनोखे घडले ।।
नसे वेळ ही दवडण्याची, करा प्रार्थना आता । कौशल्य दाखवा बुद्धीचे हीच खरी चतुरता।।

## १०
## दैवाचा गूढ कौल



हे मम बालांनो, बुद्धिमान तुम्ही, आहात की चतूर । चातुर्ये तुमच्या उघडा, नवजीवन द्वार ।।
लागू दे पणाला चातुर्य तुमचे बुद्धिला द्या ताण । परीक्षाच तुमच्या धैर्यबुद्धीची मनी ठेवा खूण ।।
द्वार न दिसे नयनाला चावी नच सापडे । कुठे शोधावे, मनास तुमच्या पडेल हे कोडे ।।
बंद असुनि द्वार हे कुलूप त्यासी नसे । चावी मात्र त्याची दिशा दाखवितसे ।।
शब्द मूक घंटेवर कोरले, हीच त्याची दिशा । अदृश्य घंटा अधांतरी, त्या टांगल्या कशा ।।
शब्द ऐकता वृद्धेचे, नजरा शोधती तिजला । अदृश्य होय ती न दिसे नजरेला ।।
काळोख दाटला आत, काही न दिसे नयनाला । भरून राहिला तो अशा पोकळीला ।।
अंदाज घेत हातांनी, दोघे पुढे सरती । निष्फळ झाला यत्न, काही न लागे हाती ।।
करिता विचार क्षणभरी, उपाय एक सुचला । चढुनि स्कंधावरी तव अधांतरी शोधु त्याला ।।
प्रार्थुनी परमेशाला, द्वयांनी स्तुती त्याची केली । घेऊनि धनुष्य हाती, सहचराच्या स्कंधी आरोहली ।।
शोधत असता तेथे जाळी दिसली छतावरी । हात लावू जाता, परि कैक सर्प त्यावरी ।।
स्पर्श होता गार, क्षणी; लहर भीतीची गेली । धैर्य एकवटूनि, पुन्हा ती सावरली ।।
दिसली कमान दगडी, सर्प होते विहरत । तिथेच दिसली तेव्हा, घंटा एक लटकत ।।
लोलक होता बांधलेला, रज्जूने त्याचा । लटकत होता त्याच्यावरती, मुकुट नि चमचा ।।
सहचर तिचा अचल उभा, देत तिज आधार । मारिता बाण, धरूनि, तुटला तो दोर ।।
लोलक पडला खाली चमच्यावरूनि घसरला । उतार थोडा झाला, चमचा जेव्हा सरकला ।।
ध्वनी उमटला मोठा, भूमी थोडी हलली । धूळ उडाली, कैक सर्पही, पडले खाली ।।
दृष्य तेथील बघता, क्षणभर दोघे विस्मित । शब्दही झाले मुके, काय हे आक्रित ।।
वृक्ष पुरातन मोहाचा, पडला तेथे नजरेला । दिव्य वृक्ष हा आदिवृक्ष म्हणती त्याला ।।
हेममय खोड तरूचे, पल्लव ते सौवर्णी । शाखा त्या रजतमय, फुले पीतवर्णी ।।
तोडता शाखा एक, सत्वर दुजी येई । समक्ष्का नवलाने, हे अघटित पाही ।।
छायेत तरुच्या दिसली चावी कोरीव, दगडात । स्पर्शिता तिला, द्वार उघडले जे होते गुप्त ।।
एक पुजारिण दिसली त्यांना खोल खोल कुपात । बसली होती एकटीच ती मंत्र काही म्हणत ।।
त्या खोल कूपामाजी भूतकाळ असे दडलेला । टेकडीवर ती भविष्यकाळ तो, पाहत वाट बसलेला ।।
वर्तमान तो, अवकाश सारा दाखविती। सुवर्णवृक्ष अन् धनुष्य, पथ तो निर्देशिती ।।
मनिषा असेल मनी, जर जाणावा भूतकाळ । तरूशाखाच नेतील तुम्हा, दावण्या तो काळ
धनुष्य तुम्हा, भविष्याकडे नेईल । वर्तमानात मात्र, वेगाने पडे पाऊल ।।
गूढ अशा या गोष्टी, आज सांगते तुम्हाला । गुपित असावे जवळी, अन्यथा जा समोर दुर्दैवाला ।।
ऐकता असे बोलणे हे काय अचानक झाले । ध्वनि उमटला, धूर पसरला, क्षणात सारे घडले ।।
ऐकू ये त्यांना तेव्हा सूर काही करूण । पडता कानी स्वरावली ती, मन होय विषण्ण ।।

## ११
## आभास अद्‌भुताचा



काळोखातील भिंतीतुनि या, सूर कानी पडले । करूण सुरावट ती, मन विषण्ण करूनि गेले ।।
कापीत काळोखाला, शब्द धडकले कानी । संभ्रमित ते दोघे, असेल कोणाची ही वाणी ।।
अरुणोदयी फिरा माघारा, वेळ न दवडा व्यर्थ । लागा कामाला आता, अन्यथा होईल की अनर्थ ।।
हाती हात गुंफून, अंतर थोडे चालता । अंधार प्रकाशाचा खेळ पाहता, मनास ये बधिरता ।।
सौवर्णी शाखा घेऊनि करी, निघाला तो त्वरेने । जाई तो सोपानमार्गे, प्रकाशाच्या दिशेने ।।
निवडला पथ तिने गूढाचा, जाणण्या भविष्याते । निघाली टेकडीकडे, घेऊनि हाती धनुष्याते ।।
काय घडले भूतकाळी त्या, जाणण्या मन उत्सुक । योद्धा तो शूर, काळोखातूनि उतरे, पायरी एक एक ।।
टाकिता पाऊल, आभासी त्या जगी, आत्म्यांना आवाहिले ।  माता पित्यांच्या आठवाने, काहूर मनी माजले ।।
जल ते काळे, कुपामाजी गोठलेले । काळोख्या त्या गूढ स्थळी, सावल्यांचा खेळ चाले ।।
आवाहिले जन्मदात्यांना, युद्धी ते मृत झाले । भोगिल्या ज्या वेदना त्यांनी, आठविता नेत्र पाणावले ।।
सावल्या त्या दोन दिसल्या, एका दारातूनि। झोत वाऱ्याचा आला, द्वार उघडता क्षणी ।।
पटता ओळख पुत्राची, सावल्या करिती याचना । ये मदतीला धावुनि, दूर करण्या यातना ।।
सांगती ते पुत्राला, न होय अग्निसंस्कार। तूच आम्हा सोडव आता, यातुनिया सत्त्वर ।।
चंपक ओढ्याकाठी, असे बांबूचे ते बन । आणाव्यास  तेथूनि, अस्थि आमुच्या शोधून ।।
सखा आमुचा म्हणुनि, जरा विसंबलो त्यावरी । द्रोह करूनि त्यानेच, केला वार आमच्यावरी ।।
फसविले त्यानेच तेव्हा, समक्काच्या मातेला । विश्वासघात करूनि, पाठीत खंजीर खुपसला ।।
भेटावे तू आता, तव पत्नीच्या मातेला । सांगेल ती वृद्धा, काही गुपिते तुला ।।
पाहुनि साऱ्या पूर्वजांना, नेत्र भरले अश्रुंनी । मार्गस्थ झाला तेव्हा, निरोप तयांना देऊनि ।।
आशिष देता जामाताला, निघाली अंतिम प्रवासाला । त्याचवेळी पाहिले त्याने, एका सुंदर नारीला ।।
कोण असावी ही? इथे कशी आली? विचार येता मनी गात्रे भयकंपित झाली ।।
पाहूनि तयाला, बोलू लागली ती वृद्धा । माता मी समक्काची, सांगते गुपित आता ।।
क्षण एक विस्मयचकित तो, जाहला । प्रतिकृतीच ती समक्काची, थोडा भांबावला ।।
सांगूनि काही गुपिते, अदृश्य ती झाली । ऐकूनि सारे मात्र, मती गुंग झाली ।।
समक्का निघे टेकडीवरी, घेण्या वेध भविष्याचा । पाहूनि ते दृश्य तेव्हा मूक होय वाचा ।
सैन्य मोठे येऊ लागले, करूनि चाल वस्तीवर । अग्नीच्या ज्वाळांनी तेव्हा भरून गेला परिसर ।।
शूभ्र चाफा अवचित लाल कसा झाला ? रुधिराने कोणी न्हाऊ घातले त्याला ?
समीप त्याच्या तिने, स्वतःस जेव्हा पाहिले ।। करंडा दिसला कुंकवाचा, मन चिंतीत झाले ।
प्रार्थना करिती सारे, रुधिर भरल्या गात्री । अरुणोदय होताच, संपल्या विषण्ण काळ्या रात्री।।
हळूच कोठूनि अरुणोदयी, प्रकाश किरणे डोकावली । दूर सारूनि भयाला ती, खाली उतरूनि आली।।
नजर शोधते पतीला, जाऊनि बिलगली त्याला । वेल कोवळी बिलगे वृक्षाला, तैसाचि तो भासला ।।

# १२
# परतीचा प्रवास



भानावर येता तेव्हा, नजरा शोधिती काही । ना विहिर, ना टेकडी, काहीच दिसले नाही ।।
समक्काही कुठे, त्याच्या नजरेस पडेना । काय करावे आता, त्याला काहीच सुचेना ।।
दूर केली जेव्हा त्यांनी, सौवर्णी शाखा । ना स्त्री कुणी, ना पुजारिण, नजर देई का धोका ।।
धूळ, माती अन् दगड दिसले चोहीकडे पसरलेले । द्वार एक छोटेसे, छिद्र होते त्यास पडलेले ।।
छिद्रातूनि त्या येत बाहेरी ते दोघे । वाट पाहात तेथे, वैद्यबुवा बसले होते ।।
जे पाहिले, अनुभवले, जग सुष्ट दुष्ट शक्तींचे । नका सांगू कोणाला सांगतो बोल अनुभवाचे ।।
गुपित हे ठेवा तुम्हापाशीच खास । अशक्य अतर्क्य गोष्टी नका सांगू कोणास।।
निघावे आता येथूनि, सूर्य जाय अस्ताला । न भ्यावे, ना रडावे, व्यर्थ न दवडा समयाला ।।
देऊनिया आशीष, निघाला मांत्रिक तेथूनि । जाई तो दूर दूर, दाट बांबूच्या वनी ।।
न ठेविले गुपीत काही, आजवरी मनात । कसे राखावे याला, आपुल्या मनी सुरक्षित ।।
विचार येता मनी, उभयता थोडे चिंतित । चालू लागले दोघेही वाट आपुली मौनात ।।
बोले समक्कासी पती तियेचा, हळूवार शब्दात । असे कठिण हे, परी बांधवांसाठी ठेवू या मनात ।।
सोबतीने परस्परांच्या चालत चंपक ओढ्याशी थांबले । स्नान करूनि तेथेची, घरी परत आले ।।
बोलणे ते आत्म्याचे, घुमे सतत कानात । राही भरूनि अस्वस्थता, त्याच्या मनामनात ।।
मारिले ज्याने मातापिता, तो सर्वशक्तीमान आता । मिळेल का न्याय तयांना, कशी पटावी विश्वासार्हता ।।
जाऊनिया बांबूच्या वनात, शोध घेतला तयांनी । अवशेष देहाचे, अन् अस्थी आणिल्या गोळा करूनि ।।
करूनि संस्कार त्यावरी, केले तेथे दहन । ऋणातूनि मुक्त होऊनि, ये गावी परतून ।।
गोष्ट एक गावकऱ्यांनी तेव्हा सांगितली । तीच, जी त्याने, आत्म्याकडूनि ऐकिली ।।
हत्यारा तो मातापित्यांचा, होता सदस्य टोळीचा । व्हावे प्रमुख आपण, हाच मानस होता त्याचा ।।
होते प्रमुख तेव्हा, शूर वीर तव पिता । परी न रुचली, मनास त्याच्या ही सत्यता ।।
मनिषा एकच, त्याचिया मनी नित्य होती । असावे मी प्रमुख, यावे साऱ्यांनी माझ्या मागुती ।।
करूनि ऐशा विचाराते, हल्ले नित्य करीतसे । सफल न हो मानस त्याचा, पराभूत तो होतसे ।।
परी एकदा गनिमी काव्याने हल्ला त्याने केला । वार करूनि प्राणघातक तो, भ्याड पळूनि गेला ।।
घेऊनि जखमा देहावरती, घरी परतले धैर्याने । समाधान ना झाले त्याचे, अशा भ्याड हल्ल्याने ।।
पाठलाग तो करूनि त्यांचा, मागे मागे येती । पेटत्या मशाली टाकल्या, त्यांनी झोपडीवरती ।।
धैर्यवान ते होते दोघे, सुखरूप त्यातूनि निघाले । वर्षाव बाणांचा होता, मात्र धैर्य त्यांचे खचले ।।
प्राण घेतला त्या बाणांनी, तेव्हा दोघांचा । शोध घेऊनि थकलो आम्ही, त्यांच्या देहाचा ।।
न मिळे तेव्हा कलेवर ते, सून्न झालो आम्ही । वाटले आम्हा, वाहून नेले देहांना पुराच्या पाण्यानी ।।
कोठे जावे? काय करावे? मती गुंग झाली । तोच बनला प्रमुख आता, दाद कोठे मागावी ।।
तुडवूनि पायदळी रिवाजांना, विरोध त्याने केला । मारले निष्पाप किती जीव, सत्ता ये हाताला ।।
असंतोषाचे बीज जेव्हा, समाजमनी रुजले । नृपाकडे तेव्हा त्याने, निज निष्ठेला विकले ।।
कपट होते मनी त्याच्या, कावेबाज तो होता । होऊनि अधिकारी तो, सुखात आहे आता ।।
छल करूनी स्वजनां संगे, फितूर तो झाला । तेहापासूनि गावाकडे तो, क्वचित कधी आला.

# १३
# निद्रा की सुषुप्ती




शंकांनी मन तिचे सैरभैर झाले । सैन्य नृपाचे प्रजेवरी, का चालुनि आले ?
ओढ्यातूनिं या नित्य वाहते; झुळझुळ पाणी । रक्तरंजति का झाले ते, कोणाची ही करणी?
भरला करंडा कुंकवाचा, काही सांगत आहे का?। गोष्टी या साऱ्या, संकेत अशुभाचा का?
पोटे फुगली शहरांची, रिकामी मात्र गावे । जंगल झाले सुने सुने, असे का घडावे?
कैक विचार नि कैक प्रश्न, उत्तर न मिळाले । अस्वस्थ मन, भयाण शांतता दोघे भांबावले ।।
कोण खरे मातापिता, का मला टाकले? प्रश्नांचे काहूर मनी, हाती काही न लागले।।
उघड्या पुन्हा जहाल्या, जखमा मनातल्या या । किती गूढ गोष्टी, आणिक लागतील पहाया ।।
दैवाची ही रीत न्यारी, काय त्याच्या मनात । कालचक्र हे का अडकले? या काटेरी दगडात ।।
कळेना काय चुकले, का वरुणराजा रुसला । किती वर्षे गेली, इकडे ना तो फिरकला ।।
भूई उसवली, नदी भेगाळली, दगडधोंडे डोकावले । कुठे सोडूनि गेली, माय आम्हा, म्हणूनि खंतावले ।।
शुभ्र जलाचा नाद झुळझुळ, असा कुठे हरवला ? लपून बसला, की उगी कुणी पळविला ।।
अवर्षणाच्या या माऱ्याने; सारे कसे पोळले । पाशातूनि या त्याच्या, कुणीच नाही सुटले ।।
मोहाच्या झाडाची तोंडे पहा सुकली । दुष्काळाची गर्द छाया, त्याच्यावरही पडली ।।
विस्कळीत ते जीवन सारे, काम नाही हाताला । संघर्ष करूनि जगण्याचा, आदिवासी तो थकला ।।
सत्ता होती राजाची, साऱ्या जंगलभागावरी। आदिवासी तो भरीत होता कर, नित्य राजदरबारी ।।
भात, तांदूळ, चिंच, फुले मोहाची अन् कंदमुळे । बाण, हत्यारे, पशु पक्षी अन अशीच काही फुले ।।
न भरता कर, तो असा कधी न राहिला । जे होते आपुल्यापाशी, ते नृपासी देता झाला ।।
परी आता दुष्काळाने, तो बहु गांजला । म्हणून त्याने या साली कर नाही दिधला ।।
असंतोषाचे वारे राज्यामध्ये, वाहू लागले जेव्हा । सीमेवरही पडसाद त्याचे, उमटू लागले तेव्हा ।।
वसूल व्हावा कर, ही गरज तेव्हा राजाची । युद्ध भडकेल कधी, छाया मनी भीतीची ।।
दुष्काळाने त्रस्त आदिवासींनी कर तेव्हा चुकविला । वसूल करण्या त्यासी, विश्वासू सरदार नेमिला ।।
तोच अधिकारी पेद्दापली राजू, मुखिया त्यांचा जुना । येऊनिया वस्तीवरी, सांगू लागला साऱ्यांना।।
दिली सूट मी, आजवरी, करात तुम्हासी । परी आता मात्र तुम्ही सत्वर द्यावे करासी ।।
धूर्त होता तो, महत्त्वाकांक्षी चाणाक्ष भारी । द्यावाच लागेल कर, आता तुम्हासी लवकरी ।।
सांगुनि त्यांना असे काही, निघूनि तो गेला । आदिवासी तो त्रस्त होऊनि कोलमडून पडला ।।

# १४
# विषाग्नी



चला, उठा, लागा कामाला, नव्या जोमाने । हे आदिवासींनो, नका खचून जाऊ संकटाने ।।
दूर ठेवू आता आपण, काही काळ विश्रांतीला । करू सामना संकटाचा परतून लावू त्याला ।।
दुष्काळाने जरी भोवती, आवळला हा पाश । एकजुटीने करू आपण त्याचाच की नाश ।।
शुष्क जाहले पाणवठे ते, पशुपक्षी तहानले । पाणी पाणी करीत कित्येकांनी प्राण तेव्हा टाकले ।।
सहस्त्ररश्मी आग ओकितो सहस्त्र जिव्हांनी । जीवनदाता असा कोपला, पाहे तीव्र नेत्रांनी ।।
सहन होईना, तेज तयाचे, भूमी सुरकुतली । नवयौवना ती, अकालीच हो वृद्धा का झाली ।।
त्रस्त मानव त्रस्त प्राणी पशू पक्षी सारे । सोडूनि जाती, किती आप्तजन रोगराई पसरे ।।
दूषित परिसर शुद्ध कराया सोडिले घरदार । कुटी जाळूनि, बेघर होऊनि, नजर भविष्यावर ।।
वृद्ध जाणते, प्रमुख सारे, जमती मेदारम ग्रामी । नका भिऊ तुम्ही, मार्ग यातूनि काढू आम्ही ।।
पुजारी अन् जाणकार जन एकत्र जेव्हा जमले । ऐकण्या विचार तयांचे, कित्येक लोक आले ।।
प्रमुख तयांचा पगडिड्डा  राजू बैसला स्वस्थानी । कार्यारंभ करिती सारे, देवासी प्रार्थूनि ।।
आवाहूनिया परमेशासी पूजा ते बांधिती । शापूनिया दुष्ट शक्तीसी हळदी कूंकू शिंपिती ।।
अग्नि करूनि प्रदिप्त, त्यांनी पूजा आरंभिली । गुगुळ टाकूनिया त्यावरी हवा, गंधित केली ।।
घुमू लागला पूजारी तेव्हा सुगंधित त्या गंधाने । बोल तयाचे एकू लागले, जन अति श्रद्धेने ।।
सांगतो आता, कारण तुम्हासी या दुष्काळाचे । सूर्य कोपला आपणावरी, काय कारण याचे ।।
दिसते मजला, भविष्य काही असे विपरितसे । नयनासमोरी मजला, चित्र सारे दिसतसे ।।
कोण अनामिक अवचित येऊनि आम्हा आज्ञापितो । नावडे मजला वर्तन त्याचे म्हणून क्रोधावतो ।।
ऐकू येई दूरवरूनि कोणता हा ध्वनि । कोण येतसे या समयाला अश्वारुढ होऊनि ।।
तुरगांचा हा ध्वनी पहा, किती तीव्र झाला । पडता कानी, पशूपक्षांचा हा जीव घाबरा झाला ।।
मृत्तिकेचा तो गुलाल उधळला साऱ्या नभांगणी । पाती भिडली तलवारींची ये नाद जवळूनि ।।
घेऊनि संगे सैन्यासी येई जव सरदार । व्याघ्रचि जणु चालून आला आमच्या अंगावर ।।
सरदाराचे त्या सर्वांनी स्वागत तेव्हा केले । सैनिकांनी निज सरदारे असेच जयघोषिले ।।
करुनि नमन देवीला, वृद्धांनाही नमिले । बैसण्या त्या सरदाराला, आसन ते दिधले ।।
बोलू लागला पेदापल्ली राजू, अति गंभीर वाणीने । निस्तेज, ओसाड जागी आलो बहुत दिसाने ।।
देव मानूनि नृपास, तुम्ही देणे त्याचे द्यावे । कर भरूनिया त्यासी, प्रसन्न करूनि घ्यावे ।।
दिला न कर त्यासी तुम्ही, अवमान बहू केला । म्हणूनिच तो आता, तुम्हावरी क्रोधावला ।।
बोलूनि ऐसे, सांगे तो पुजाऱ्यासी । कथावे आता लोकांना तुम्ही भविष्यासी ।।
रक्तरंजित होईल भूमी, उध्वस्त सारे जीवन ।सून्न तो पुजारी, भविष्य ऐसे जाणून ।।
मृत्यूद्वारी सोडेल तिजला जेव्हा तिचा बाप । साधूनि शरसंधान तियेवरी ओढुनिया चाप ।।
नको नको देवा आता हे असे पाहणे । यावा मृत्यू या क्षणी मज अन्य नसे मागणे ।।
बोलत असता निज वाचेने संमोहित पुजारी । करू लागला वार सपासप त्वरे छातीवरी ।।
मूर्च्छा येऊनि पडला खाली तेव्हा भूमीवरी । काय करावे न कळे काही संभ्रमीत सारी ।।

# १५
# समर्थ नेतृत्व



स्वतःच स्वतःवरी वार करूनि होय पुजारी बेभान । काय केले आपण याची त्याक्षणी नसे जाण ।।
वार करूनि निज कायेवर घायाळ तो जाहला । दृष्य पाहूनि ते पगडिड्डा राजू सावध क्षणी झाला ।।
धावत जाऊनि तया समीप तो खंजीर घेई काढूनि । मलम लावूनि घावावरती, त्यासी शांतविले त्यांनी ।।
प्रसंग ऐसा बाका पाहुनि, जन सारे गोंधळले । सैन्याने तेव्हा त्यांच्या, क्षोभासी शमविले ।।
सत्य काय हे गुपीत तेव्हा दोघे होते जाणत । शब्द पाळणे कर्तव्य मानुनी, दोघेही बसले शांत ।।
कोण असे हा, नाव काय? वाटते असावी परिचित । पेदापल्ली राजू मांत्रिकासी होता तेव्हा विचारीत ।।
शूर योद्धा हा, पगडिड्डा राजू पुत्र नागराजूचा । प्रमुख होय आता तो, आदिवासी जमातीचा ।।
तोच का हा नागराजू, मारिले जया शत्रूने । न होय पुनरावृत्ती याची, सांगे सरदार शांतपणे ।।
आवरूनि क्रोधाला, संयम मनी धरिला । पगडिड्डा  राजूने तयाकडे तुच्छ कटाक्ष टाकिला ।।
जखमा बांधूनि पुजाऱ्याच्या शांत तयाला केले । वाहण्या काळजी त्यासी वैद्याकडे सोपविले ।।
पडता नजर तीक्ष्ण विखारी, पगडिड्डा राजूवर । म्हणू लागला तयासी, शूर वीर तू आहेस धैर्यधर ।।
यावे तू नृप सैन्यामाजी, ऐसे मज वाटते। योग्य स्थळ तुजसाठी निश्चित असेल की ते ।।
मुखिया तू येथील, आहेस शूर वीर । तूच आता या साऱ्यांचा भरावास कर ।।
बोल ऐकूनि त्याचे नेत्री अंगार त्याच्या फुलला । तीक्ष्ण, संयमित वाणीने त्यासी सांगू लागला ।।
पालन करणे प्रजेचे कर्तव्य असे नृपाचे । विस्मरण कसे होय त्यासी निजधर्माचे ।।
मागण्या कर, नसे योग्य ही वेला । दुष्काळे त्रस्त सारे, निसर्ग ही कोपला ।।
बोल ऐसे ऐकूनि क्रोध त्याचा फुलला । पेदापल्ली राजू ते वेळी परी, शांतचि राहिला ।।
वाटे उपवासे खड्ग नि करावा वार । नेत्री पेटला अग्नि, हृदयी फुले अंगार ।।
सावधान म्हणूनि धावुनि जाई पुजाऱ्यावरी । आज्ञा होय राजाची, यास्तव आलो इथवरी ।।
श्रेष्ठ होय नृप, आज्ञा त्याची पाळा । देणगी द्यावी त्यासी कर करावा गोळा ।।
क्रोधाग्नि हा तुमचा करील भस्म तुम्हासी । व्हा सावध अन् ठेवा मनी दाबून त्यासी ।।
शस्त्रे तुमची मातीची, दगडाची आहेत कुचकामाची । लोखंडी शस्त्रापुढती; ना कधी टिकायची ।।
सांगणे माझे एकच असे, कर तुम्ही भरावा । संदेश राजाचा हा आपण मान्य करावा ।।
सांगुनि ऐसे, होऊनि अश्वारूढ तो निघाला । जंगलातील व्याघ्रराजची जणू तो तेव्हा भासला ।।
तलवारींची पाती जेव्हा एकमेका भिडली । आवाजाने त्याच्या जनता सारी भयकंपित झाली ।।
उभा तयापाठी धीरोदात्त तो पगडिड्डा राजू । नका होऊ चिंतीत तुम्ही, मार्ग आपण काढू ।।
सांगूनि ऐसे साऱ्यांना, धीर त्याने दिला । आदिवासींना नेता आपला, अति प्रिय झाला ।।

## १६
## युद्धपश्चात



युद्धाची ही न्यारी भाषा न कधी कोणा कळली । जगण्याची खोटी आशा, न कधी कोणाची सुटली ।।
युद्ध म्हणजे मृत्यू साक्षात् दाराशी घुटमळतो । चिखल रक्तामांसाचा, भयाण रूप दाखवितो ।।
मन सैराटले, नेत्र रक्ताळले संहार करीत निघाले । परिणामांची नसे तमा, सर्वस्व त्याने नाशिले ।।
तांडव करितो मृत्यूदारी होऊनिया बेधुंद । असा कसा लागे त्याला जीव घेण्याचा छंद ।।
विचार थिजला, विवेक सरला, नयनी अंगार फुलला । मदमस्त त्या मनाने, वन्ही युद्धाचा चेतविला ।।
किती देहांच्या रुधिराची, नदी तेथे वाहिली । गिधाडांनी साऱ्यांना, खबर त्वरे पोचविली ।।
कोल्हे, कुत्रे वासांनी त्या, सावध तेव्हा जाहले । जीव तोडूनि, त्यामागे धावत की सुटले ।।
काकदृष्टी पडता त्यावरी, झडप त्यांनी घातली । माश्यांनी ही फेर धरूनिया किती गाणी गायिली ।।
प्रेतावरती बसल्या माशा, किती दिमाखात । श्वानही तेव्हा तिथेच आले, हिस्सा आपला मागत ।।
भयाण दृष्य ते युद्धाचे, मन घाबरे होते । खेळ नसे हा साधा सोपा, जीवन ते संपविते ।।
युद्धी जे होती मृत, त्यांसी प्राप्त वीरमरण । राहती जे मागे जन, त्यांना मात्र शाप दारूण ।।
अश्रू वाहुनि थकले, नेत्र ज्योती थिजल्या । किती स्मृती दगडांवरती, वीरांच्या त्या कोरल्या ।।
लहान बालके किती रडती भुकेल्या पोटाने । विधवा स्त्रिया सून्न होती, त्या दारुण दुःखाने ।।
अतृप्त आत्मे, उध्वस्त घरे सारी स्मशानकळा ती । चित्र भीषण युद्धपश्चात, नयनापुढती तरळती ।।
गर्द हिरवे रान, तुडुंब पाणवठे आज दिसे प्रसन्न । चित्र पालटे युद्धानंतर देह कुजले, जिवंत ते आसन्नमरण ।।
जिवंत जे जन, अन्नपाण्याविन तडफडती । पशू पक्षी अन् कितीक प्राणी चक्षु पुढती मरती ।।
मरण बरे नको जीवन, किती किती यातना । सांगावे तरी कोणाला, मनीच्या या भावना ।।
मृत देहांचे खच पडले, जागोजागी किती । रोगराईने हल्ले केले ये नवीन आपत्ती ।।
विजय पताका फडकवी, साम्राज्यी आपुल्या जेता । विजयाचा उन्माद कसला, विस्मृतीत मानवता ।।
मंदिरांचे पावित्र्य हरवले, सौंदर्यही विद्रुपले । क्रौर्य भरले अंगी, पराभुतांना गुलाम केले ।।
अबलांवरती हल्ले जेव्हा त्यांनी अनेक केले । माणुसकीला जणू तेव्हा काळे की फासले ।।
क्षण एक विश्रांती घेऊनि, लुटारू मार्गी चालती । निष्ठा ज्यांनी विकल्या, ते दल बदलून घेती ।।
साम्राज्य जाई लयाला, सारी वाताहात । मेले ते सुटले, जिवंत ते रोजच मरतात ।।
काळ जाता काही, वर्तमान तो इतिहास होई । काही खरा, काही खोटा, जगा सामोरी येई।।
वीरमरण ज्यांना आले ते अमर जगी जाहले । देवत्त्व देऊनि त्यांना सारे नतमस्तक झाले ।।
होऊनि पराभूत युद्धी जगी ते विजयी झाले । बाजीगर म्हणूनि त्यांना, नित्यची गौरविले ।।

## १७
## वरंगल दरबारी



आयुष्य लागले उताराला, कधी न देखिला दुष्काळ । असा भीषण तो आला, जसा जीवावरचा काळ ।।
संकट मोठे आम्हा समोरी, जीवन जगतो कसे तरी । कसे भरावे आम्ही कराला, आता नृपदरबारी ।।
करण्या उकल या प्रश्नांची , प्रमुख सारे जमती । विचार करूनि आपण आता, मार्ग शोधू यावरती ।।
सरदार प्रमुख ते आदिवासींचे, तेव्हा एक होती । खंडणी विरोधी ते प्रथमच, एक्या मते बोलती ।।
भोगणे दारिद्र्य हा जणू, शाप मानवजातीला । समदुःखी ते करिती सारे, एकाच विचाराला ।।
मुखिया तो नेल्लीं राजू, सांगे एकविचार । शिष्टमंडळ घेऊनिया एक, जाऊ राजासमोर ।।
सांगू आपण संकट आपुले, घालू त्यासी साकडे । सूट द्यावी करात आम्हा, करा उपकार एवढे ।।
निसर्गाची होईल कृपा, पुढल्या साली निश्चित । देऊ तेव्हा कर सारा, आणुनि तुम्हाप्रत ।।
विचार त्यांचा मान्य करूनि, मंडळ ते स्थापिले । पाच प्रमुख, वृद्ध, वैद्य तयामध्ये समावेशिले ।।
पुत्र आमुचे सैन्यामाजी, सेवा करिती नृपाची। मस्करी करी का राजा, करूनि मागणी खंडणीची ।।
करणे प्रजापालन, कर्तव्य श्रेष्ठ राजाचे । नसे का जाणीव याची, का भान नसे दुष्काळाचे ।।
दुष्काळाची काळी छाया, पसरे आम्हावरी दाट । तूच आम्हा साह्य करोनि, दावावीस वाट ।।
रानटी, अडाणी म्हणूनि, राजा न करील स्वागताला । दुष्काळाने त्रस्त आम्ही जाऊनि सांगू त्याला ।।
करूनि प्रार्थना त्यासी, विनवू वारंवार । द्या सुट करातूनि समय कठिंण पातला फार ।।
भेट म्हणूनि देऊ त्यासी, काही दुर्मिळ गोष्टी । प्रसन्न करूनि घेऊ त्यासी तुम्ही न व्हावे कष्टी ।।
नेतृत्वी त्या पगडिड्डा राजूच्या, तेथे आपण जावे । वास्तव ते दुष्काळाचे, नेल्ला राजूने कथावे ।
विचार ऐसा करूनि, प्रार्थिती परमेशाला । निघाले ते सारे जण, वरंगलग्रामी जाण्याला ।।
पोचता ग्रामासमीप थोपविले तिथेच त्यांना । म्हणे न जावे ग्रामाभितरी, नृपासी तुम्ही भेटण्या ।।
न भेटेल राजा तुम्हासी कामी तो व्यग्र । शिक्षा करितसे शत्रुंना, याक्षणी तो उग्र ।।
प्रतिनिधी राजाचा, बांधव असे आपुला । सांगू त्यासीच सारे, निसर्ग कसा कोपला ।।
ऐकेल तो व्यथा आपुल्या, अन् आपले गाऱ्हाणे । सांगेल तोचि नृपासी, आपुले सारे म्हणणे ।।
वाट पाहूनि थकले सारे, काय करावे आता । असूनिया बांधव आपला, न करे सहाय्यता ।।
काय करावे म्हणूनि आता, प्रश्न उभा राहिला । निवासस्थानी जाऊनि त्याच्या भेटावे त्याला ।।
विचार ऐसा करूनि सारे तिकडे निघाले । निरोप धाडिला त्यासी, परी कोणी ना विचारिले ।।
दिवसभरी वाट पाहूनि, ते सारे थकले । सायंकाली रक्षकांनी त्या, आत साऱ्यांना सोडले ।।
सांगे त्यासी नेल्ला राजू, व्यथा आपुली मांडली । तू आमुचा म्हणुनि, येण्याची हिंम्मत केली ।।

# १७
# वरंगल दरबारी



दया करूनि तू आम्हावरी क्षमा आम्हास करावी । दुर्लक्षुनि अपराधांना कर माफी द्यावी ।।
त्रस्त आम्ही दुष्काळाने, जंगले पडली ओस । पाय पसरले रोगराईने तुझ्यावरीच आस ।।
देण्या खंडणी याक्षणी, काही नसे हातात । थांबावे आपण कृपा करोनि, शेत पिके पर्यंत ।।
बोल आदिवासींचे ऐकुनि, नच तया काही वाटले । असेल संकट तुम्हावरी परी, नृपावरीही ते पातले ।।
युद्धजन्य ती स्थिती राजापुढती असे । संकट तुमचे तयापुढे, मज क्षुद्रचि भासे ।।
नसेल जर देण्या धन, करा काही उपाय । घरे विका, धान्य विका अन् करा पैशाची सोय ।।
न ऐकेल राजा आता तुमचे काही बोल । करा सहकार्य अथवा द्या प्राणाचे मोल ।।
पगडिड्डा राजू सांगे आम्ही मुले जंगलाची । मुक्त आम्ही असू, नको जिंदगी गुलामाची ।।
जंगलचे राजे आम्ही, जगतो राजापरी । मरतोही राजापरीच, नकोच आम्हा गुलामगिरी ।।

## १८
## कसोटी धैर्याची




शब्द ऐकता पगडिड्डा राजूचे, ते स्वाभिमान अन् धैर्याचे । गर्जूनि त्यासी बोले पेदापल्ली राजू न बोलावे शब्द उर्मटपणाचे ।।
असशील तू शूर वीर अन् धैर्यशील पुत्र । मी ही नव्हे कमी, मी तर राजाचा दूत एकमात्र ।।
मजवाचूनि तुम्ही ना राजासमीप जाणार । मनात आणिले मी तर, रिक्त हस्ते तुम्ही परतणार ।।
भाषा नको तुझी उद्धट, उर्मट अन् नको ही अरेरावी । दुर्लक्षिले मी वर्तन तुझे, परी आता दया नसावी ।।
बोलूनि ऐसे तो, आज्ञा करिता जाला । कैद करूनि न्यावे याला, त्वरित अंधार कोठडीला ।।
सैन्याने तेव्हा उपसल्या तलवारी अन् भाले । कडे करूनि भोवती, चहुबाजू त्या घेरले ।।
नव्हे जंगल हे, न चाले तुमचे राज्य येथे । आग वनात भडके, पडताचि ठिणगी विझते येथे ।।
हे वृद्धानो, सावध व्हा अन् घरी परता आता । द्या खंडणी आणुनिया, जा घेऊनि मग आपुला भ्राता ।।
ओलीस ठेवले आम्ही यासी आमुच्यापाशी । करा प्रयत्न आता तुम्ही, याच्या सुटकेशी ।।
पेदापल्ली राजू ओरडूनि सांगे साऱ्यांसी । जा आता परत न थांबा येथे क्षणभरासी ।।
संकट आले दारी आपुल्या, की घेतले ओढवून । न समजे वृद्धांना, काय चुकलो आपण ।।
सापडलो आपण आता, दुष्ट अशा व्युहात । मार्ग नसे परतण्याला आता, बाहेरील जगात ।।
परी हिंमत न हरावी, नव्हेत आपण डरपोक । जिंकूनि लढाई, आणू परत त्याला दिवस एक ।।
प्रतिकार तो करी तेव्हा, सर्व शक्तिनिशी वीर । परी न चाले काही त्याचे, त्या सैनिकांसमोर ।।
नेण्या कोठडीकडे, त्यासी रज्जूने बांधला । व्याघ्र जणू तो, परी हतबलचि ठरला ।।
वयोवृद्ध ते विनवितसे, सरदारासी वारंवार । मुक्त करावे त्यासी, दया करा आम्हावर ।।
परी काही न ऐके तो, उन्मत्त बहू जाहला । चर्चा न होय यावरी फिरा परत तुम्ही घराला ।।
शेवटी सत्तेपुढे शहाणपण ते, काही न च चाले । विनंती करूनि वारंवार प्रयत्न व्यर्थचि गेले ।।
आपलाची होय आपणासी फितूर, काय ही दैवगती । अपमानित ते सारे, माघारा घराकडे परतती ।।
नेता आपला शूर वीर तो, कैद आता झाला । मुक्त करावे कैसे त्यासी, जो तो, विचार करू लागला ।।
द्यावे का निजपुत्रांना, सैन्यासाठी नृपाला । की करावा विद्रोह, अन् सोडवावे सरदाराला ।।
विचार करूनि बुद्धि शिणली, संकट भारी पडले । मार्ग यातुनि कसा निघावा, विचार सुरू जाहले ।।
एकजुटीने करू सामना, या भीषण संकटाचा । शस्त्रसाठा करू प्रथम, मग विचार एल्गाराचा ।।
विचार करी समक्का, मी का मागे मोहिमेत यांच्या । सामील होऊनि मी ही लढावे, पतीसाठी माझ्या ।।

## १८
## कसोटी धैर्याची




मुलांनाही घेऊनि संगे, करू लढाई आपण । जे जे येतील संगे आपुल्या, त्या साऱ्यांना घेऊन ।।
येता दिन शिवरात्रीचा, निघू आपण मोहिमेला । घेऊनि आशीर्वाद ज्येष्ठांचे, जाऊ राजधानीला ।।
संगे घेऊनि निज शस्त्रांना , निघती ते कार्याला । कारागृहापाशीच निवडती, जागा तेथे राहण्याला ।।
होता आदिवासीच तेथे, सुरक्षारक्षक कारागृहाचा । करेल मदत आपणासी, म्हणुनि हात पुढे केला मैत्रीचा ।।
पोचविला निरोप त्याने, पगडिड्डा राजूसी कारागृहात । चिंता नसावी, कुटूंब तुमचे, आहे याच परिसरात ।।
प्रयत्न करूनि अथक ते, तुम्हासी सोडवतील । घेतल्या शिवाय तुम्हासी, ना घरी परततील ।।
सैनिक राजाचे गेले होते, मोहिमेवरी जेथे । विजयी होऊनि परत आले, करीत जयघोषाते ।।
विजयाचा तो उत्सव केला, तेव्हा साऱ्या जनतेने । मुक्त केले कैद्यांना साऱ्या, त्याने अति हर्षाने ।।
जाऊनिया कारागृही पेदापल्ली राजूने भेट तेव्हा घेतली । हिणवण्या त्यासी, काही विचारणा ती केली ।।
राजा आमुचा शूर वीर अन् असे वैभवसंपन्न । पाहिलेस तू वैभव त्याचे, आता जवळून ।।
तुच्छ लेखले आम्हास तू, आलो तुझ्या वस्तीला । परिणामी तूच भोगलेस, या क्रूर शिक्षेला ।।
उत्तर करितो, पगडिड्डा राजू, तेव्हा अति धैर्याने । जशास तसे वागणे तुमचे, शिकलो मी अनुभवाने ।।
प्रेम द्यावे प्रेमाला, अन रुधिर ते रुधिराला । हीच असे रीत खरी सांगतो मी तुम्हाला ।।

# १९
# भव्य राजधानी वरंगल



सृष्टी रचिली भगवंताने, सारा मायेचा पसारा । तोच कर्ता, तो नियंता, रचिला खेळ सारा ।।
काय चाले मनी त्याच्या, कोणा नच कळले । मानव सारे असती त्याच्या करातील बाहुले ।।
निर्णय सारे तोच घेई, हा खेळ खेळतांना । न कळले जिवास हे, करी जवळ मात्रिकांना ।।
भक्ती न दिसे, मनी त्याच्या, किंचितही ईशावरी । मंत्र तंत्र करूनि, धरी छाया भीतीची, मानवावरी।।
सांगतो भविष्य आम्ही, म्हणती जे मांत्रिक । खोटे ते असते, न च ते काही जाणत ।।
मंत्र म्हणूनि उगाच साऱ्या, लोकांना भुलविती । लोकही तेव्हा त्यांच्या मागे, अकारणच जाती ।।
सुगंध तो दरवळे धूपाचा, अन् पेटता अंगारा । भारलेल्या त्या स्थळी, हळदी कुंकवाचा पसारा ।
ओढुनि गांजा, चिलिम वा दारूच्या नशेत । सांगणे देवाचे सांगतो, म्हणूनि असतात ते फिरत ।।
शब्द गूढ किती, अनाकलनीय अन् गंभीर । भ्रमाचे मोहजाल पसरले, त्यांच्या भोळेपणावर ।।
खरे कशास म्हणावे अन्, कसे जाणावे खोटे । अंधश्रद्ध मन, तेव्हा उगाच संभ्रमी पडे ।।
दंतकथा अन् भ्रामक गोष्टी होत उद्याचा इतिहास । परंपरेने जात पुढे तो, वारसा पुढील पिढीस ।।
भव्य बांधुनि घरे मंदिरे, वेशी कमानी अन् किल्ले । मानिती तयासीच ते, खोटी आपुली आधारस्थळे ।।
होता दरारा तेव्हा, चोल चालुक्याचा दख्खनच्या पठारी । काळ काही लोटता यादव देवगिरीचे येत राज्यावरी ।।
कर्नाटक प्रांतामाजी, राज्य होते होयसळ राजांचे । राज्य करिती तामिळनाडूत पांड्य राजे मदुराईचे
प्रसिद्ध राजे काकतीय, होते शूर वीर अन् धैर्यधुरंधर । वरंगल तयांची राजधानी, राज्य करिती तेलगु प्रांतावर ।।
असून शेजारी ते नसती मैत्रीचे व्यवहार । कुरघोडी करिती नित्यचि, ते परस्परांवर ।।
संधी साधूनि शत्रु, तयावरी हल्ला तेव्हा करिती । नसे जाणीव तयांना किंचित ते आपल्यातच लढती ।।
कार्यकाळी प्रथम रुद्रदेवाच्या चालुक्य राजे स्वतंत्र जाहले । तेलगुवरी कानडीने, निज वर्चस्व स्थापिले ।।
सहस्त्र स्तंभ रचूनि, भव्य मंदिर उभारिले । हनमकोंडा ग्रामी तेव्हा ते प्रशंसनीय ठरले ।।
गणपती देवा नामे नृपाची राजधानी वरंगल । भव्य तटबंदी केली त्याने साऱ्या सभोवताल ।।
राजधानी काकतियांची प्रसिद्ध ती जाहली । भव्य किल्ला, मंदिरेही कितीक याने स्थापिली ।।
बुरुज मोठे, भव्य कमानी, वेशी उभारल्या कैक । भव्य दिव्य ते पाहून तेव्हा होत सारे अचंबित ।।
कन्या त्याची रुद्रम्मादेवी होती शूर अन वीर । राज्य करी तेव्हा ती, त्या साम्राज्यावर ।।
अधिराज्य ते नारीचे, नव्हते मान्य अंबदेवासी । स्वतंत्र मी, नको वर्चस्व स्त्रीचे, नित्य वाटे त्यासी ।।
याच मिषे त्याने केली घोषणा स्वतंत्र राज्याची । मी नच मानितो, सत्ता कोण्या नारीची ।।
राज्य केले राणीने, धैर्य अन् संयमाने । तिच्या मागूनि राज्य केले प्रतापरुद्र देवाने ।।
पुत्र असे तो मुम्मादम्माचा, राजा तो झाला । करूनि हल्ला अंबदेवावरी त्याचा बिमोड त्याने केला ।।
भव्य दिव्य ते वरंगल होते, ते समयी काकतीयांचे । परकीय आक्रमण झाले तेव्हा, राज्य लोपले त्यांचे ।।
नष्ट होय, ती भव्य दिव्यता, सौंदर्यही लोपले । जेव्हा तेथे परकियांनी, त्यांचे राज्य स्थापिले ।।

## २०
## सुखाची चाहुल



संपन्न ती नगरी, एक शिलेतुनि निर्मिली । वरंगल ती राजधानी, प्रतापरुद्रदेवाने केली ।।
चार वेशी बुलंद, द्वारे ही भव्य मजबूत । पाहूनि सौंदर्य ते, जन सारे आकर्षित ।।
संपन्नता ती कशी वर्णावी, कोण्या शब्दे सांगावी । हिरे माणके, मोती असतील बहु, गणती कशी करावी।।
कण वाळूचे खंदकातील, अथवा मासे जलातील । येतील मोजता परी, अशक्य मोजणे रत्ने जी भांडारातील ।।
सुवर्ण ते किती, कैसे तयाचे वर्णन करावे । दिला मुलामा पर्वतांना, तरी ते कणभरीच सरावे ।।
भांडार भरले सुवर्णाने, हिरे, मोती, माणकाने । भोगिली ती संपन्नता, प्रतापरूद्रदेव राजाने ।।
कैक प्रवासी व्यापारी ते येत नित्य नगरीत। हिरे मोत्यांचे ढीग पाहुनि क्षणभरी विस्मित ।
बांधिले मंदिर, गणपती देवाने मध्यभागी शहराच्या । असती याच खुणा, नगरीतील सौंदर्याच्या ।।
निर्मिली सुबक, भव्य नृत्यशाळा रुद्रम्मादेवीने एक । विवाह शिव पार्वतीचा आदि उत्सव होत अनेक ।।
जात असता नगरातूनि या, पगडिड्डा राजू उदास । कळेना त्यासी, कोणत्या मिषे लोक येती इथे वास्तव्यास ।।
का रुचे लोकांना, इथले हे बंदिस्त जीवन । खरे स्वातंत्र्य कोणते, नसेल का त्यांना जाण?
वनात गेले आयुष्य ज्यांचे, त्यांना कसे कळायचे। शहारातील या जीवनाला, सामोरे कसे जायचे ।।
मुक्त जीव ते वनातील की, स्वच्छंदी हिंडावे । नगरातील बंदिस्त जीवन हे, त्यांना कसे झेपावे ?
विचार करूनि शिणला मेंदू, मार्ग ना कोणता दिसे । चिंता उद्याची करूनि, मन हो वेडे पिसे ।।
परतीच्या त्या प्रवासमार्गी, कल्लोळ विचारांचा । करावा प्रतिकार अन् सामना करावा आपत्तीचा ।।
उलट सुलट विचारांचे, मनी वारे घोंघावले । जाताना जंगलात, पावसाने स्वागत केले ।।
पाहुनिया त्या सरी पावसाच्या, थोडे ते सुखावले । गावकऱ्यांनी नेत्याचे आपुल्या, जंगी स्वागत केले ।।
सुटका झाली नेत्याची, सारे प्रार्थिती ईशाला । देवा आभार तुझे, सुखरूप आणिलेस नेत्याला ।।
रोजचाच सूर्य आज, तीव्र कसा भासला । वाटे, आता खरा ग्रीष्म सुरू जाहला ।।
काढू मार्ग यातुनि आपण मिळूनिया सारे । ग्रीष्मानंतर येतील आपसूक, थंडथंड वारे ।।
करू स्वागत त्या दिवसांचे, मन पुलकित होई । पाऊस वारे झोंबून अंगा, शिरशिरी कशी येई ।।
लखलखणारी वीज पहा, नभी कशी चमकली । त्याचवेळी मेघांनीही काळ्या, दाटी अंबरी केली।।
जल भरले ते मेघ पाहुनि, हो हर्षित जंगलवासी । हे मेघांनो, रिते होऊनि आमच्यापाशी तृप्त करा मनासी ।।
पशू पक्षी ही आनंदाने, नाचू गाऊ लागले । मयुरांनीही सुखद क्षणी या नृत्य छान केले ।।
आनंदे विहरती पक्षी, गाणी गात स्वच्छंदे । झाडे वेली डोलू लागली पहा कशी आनंदे ।।
श्रम भरल्या त्या कायेला आस घोटभर पाण्याची । दुष्काळल्या त्या धरेला वाट जलभरल्या घनाची ।।



## २१
## हा खेळ सुखदुःखाचा


जलभरले ते मेघ पाहूनि आसुसली ती मने । गेली होती होरपळून ती सतत दुष्काळाने ।।
तृप्त देवा आम्ही, धरतीने कृपा जरी केली । पोट भरण्याजोगी भाकरी, तिने आम्हा दिली ।।
होती सारी जंगलाची बाळे, जरा आनंदात । येई खलिता तेव्हा नृपाकरवी, भर पडे दुःखात।।
दहा तरुण ते ग्रामातुनिया, प्रत्येकी द्यावेत आम्हाला । भरती होऊनि सैन्यामाजी, वाढवा नृप बलाला।।
नकोत गोष्टी तडजोडीच्या, अन्य नको कारणे । पेदापल्ली राजू प्रमुख तुमचा, ऐका त्याचे सांगणे ।।
निरोप ऐकता नृपाचा, दुःखी सारी झाली । जलधारेच्या वर्षावाने, होती जरा सुखावली ।।
येईल आता सण नवरात्री नऊ दीस अन् रात्रींचा । करू साजरा हर्षोल्लासे, काळ जाई आनंदाचा ।।
वनराजी ती बहरून उठली आनंदे डोलती । रंग सुंगधी उधळण होई, साऱ्या आसमंती ।।
मन भरले, आनंदाने, उत्साहाने पाहुनि रंगसोहळा । रंग कसे ते, गंध नवे चला करू सारी फुले गोळा ।।
पुष्पांनी या सजवू गोपुरे, रेखाकृती सुंदर । रंग मनोहर भरू तयामध्ये, दिसेल ते चित्तहर ।।
आणुनि पुष्पे तऱ्हेतऱ्हेची, आरास करू देखणी । फेर धरूनि नाचू आपण, गाऊ सुंदर गाणी ।।
गीतातुनि या बथुकम्माला करू मिळुनि प्रार्थना । हे माते तू कृपामय होऊनि, पुरवावी कामना ।।
हे माते, हे गौरी, आदिशक्ती तू, साऱ्यांची आई । सेवा आमुचि मानुनि घे तू, कृपावंत होई ।।
सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर जीवन आरुढले । कधी सुखावले तर कधी ते दुःखाने रडले ।।
तूच आमुची आदिमाया, अन् तूच आमुची चेतना । प्रेम कटाक्ष टाकुनि क्षणभरी शांत करी गे मना ।।
फेऱ्यातुनि या जन्ममृत्यूच्या नच कोणी सुटला । मृत्यूदिन ही जन्मदिनी की त्याचा हा ठरला ।।
कटाक्ष तुझा हा पडता, जन्म जीवाचा होई । तू मिटता डोळे, त्याचा प्राण कुडीतूनि जाई ।।
दया करावी आम्हावरी तू, कृपाकटाक्ष टाकावा । रक्षण करण्या दुष्टांपासुनि करू तुझा धावा ।।
तू माता तू दात्री आमुचि तूचि मायभवानी । प्रसन्न होऊनि आम्हा देसी अन्नासी भरभरूनी ।।
प्रतिपदेसी बांधू तव पूजा शैलपुत्री रूपाते । आरुढ होऊनि नंदीवरती चंद्रधारी तू माते ।।
करूनि पूजा भक्त तुजसी नैवेद्यासी अर्पिती । ओदन आणिक गोड शिरा तो तुजला प्रेमे देती ।।
द्वितीयेसी येशी जेव्हा रूप कुमारी घेऊनिया । गुलाब पुष्प ते किती शोभती करात की तुझिया ।।
तुला अर्पिती वरण भात अन् पुरण ते चविष्ट । कृपावंत तू दीनदयाळू भक्ता करीसी तुष्ट ।।
तृतीयेसी व्याघ्रारुढ तू आयुध ते हाती । चंद्रघंटा रूप तुझे ते नयनी साठविती ।।
प्रसन्न करण्या तुजसी भक्त किती कष्टती । दूध, गुळ अन् भाात साधा नैवेद्यासी देती ।।
चतुर्थीला रूप तुझे ते, कुष्मांडधारी असे । भात साधा अर्पुनिया भक्त सुखे पावतसे ।।
दिन येता पंचमीचा तु स्कंदरूप धरिसी। सिंहारूढ होऊनिया तू निज भक्ता तोषविसी ।।
दिन विशेष म्हणुनि भक्त तुजला देती गोड पोळी । स्वीकारूनिया सप्रेमे तू रक्षिसी वेळोवेळी ।।
षष्टीला तू स्वार होऊनि सिंहावरती कात्यायनी रूपाते । महिषासूर मर्दिनी तू निर्दालिसी शत्रूते ।।

## २१
## हा खेळ सुखदुःखाचा



उपवास तुला म्हणुनि भक्त धरिती उपवासाते । रिपुमर्दना ते केले म्हणुनि होती हर्षविभोर ते ।।
दिन येता सप्तमीचा तो कालरात्री तू होसी । गर्दभारुढ होऊनिया शुंभनिशुंभा हंत्रीसी ।।
गोड पुऱ्या अन् निंबफळे ती तुला समर्पिती । हाके सरशी ये धावत तू निजभक्ता रक्षिती ।।
अष्टमीचा दिन आनंदाचा शत्रुचा हो निःपात । महागौरी तू डमरूधारी साठवू रूप नेत्रात ।।
तूप गूळ ते तुला अर्पिता भक्ती दाटे मनात । उत्सव करिती भक्त तुझे ते किती आनंदात ।।
नवमीला तर आदिशक्ती तू अर्धांगी शिवाची । निर्गुण म्हणुनि भक्त तुजला आज कसे पूजिती ।।
सिद्धिदात्री तू, तू जगदंबा पूजा आज मांडू । नैवेद्यासी पंच पक्वान्ने तव ताटी वाढू ।।
दहीभात अन् चिंचभात तो, चित्रान्न ते छान । नारळीभात ही अर्पुनि तुजला , करू तुझे स्तवन ।।
दया करावी निज भक्तावरी दुष्टशक्ती निर्दाळून । आशिष देऊनि आम्हास की कर आमुचे रक्षण ।।
किती स्तवावे, किती पुजावे तुजसी द्यावे मन । दिन भाग्याचे, क्षण भाग्याचे प्रत्यंतर क्षणक्षण ।।
दशमी दिनी करू विसर्जन तुझे शुद्ध जली । जे देशी आम्हाते ते तुज अर्पू भावांजली ।।
उत्सव ऐसा चाले तेव्हा दहा दिवस देवीचा । आनंदे ती सारी लेकरे, पूर मनी भक्तीचा ।।
काळ सुखाचा नसे निरंतर कधी कसा सरतो । जाताना तो दुःखाचा हात हाती देतो ।।
तसेच घडले आज इथे आदिवासी जनात । आनंदे नाचती सारे तेव्हा युद्धाचे पडघम की वाजत ।।
शस्त्रधारी सैनिक सारे शक्ती लोका दाविती । परेड करूनि मार्गातुनि या मिरवणुका काढिती ।।
शस्त्रे सारी ठेवी परजून विजयादशमी दिनी । शंख, भेरी, ढोल, ताशे उच्चस्वरे वाजवूनि ।।
आसमंत तो भरूनि गेला, ऐशा रणवाद्याने । क्षण ठोका चुकला हृदयाच ऐशा त्या गर्जनेने ।।
पेदापल्ली राजू तो, स्वार्थे आंधळा झाला, स्वार्थापायी आपुल्याच लोकांचा तो शत्रू की हो बनला ।।
अती वाढता कांक्षा ती स्वार्थ सोबती येई । विसरूनिया संस्कृतीला, कधी न कुणी मोठा होई ।।

## २२
## युद्धाची ठिणगी




उत्सव सरला बहु आनंदे, सारे जरा विसावले । त्याचवेळी रणांगणी ते रणवाद्य हो वाजले ।।
कानी येता आवाज त्यांचे, सावध सारे झाले। काळीज हलले, संकटांचे येणे त्यांना दिसले ।।
राजे ते दक्षिणेचे लक्ष्मी नित्य प्रसन्न । मोहाने त्या, राजे उत्तरेचे करिती आक्रमण ।।
देश विशाल, परी नसे तो एकसंध । नित्य भांडणे, आपसात ती, त्यातच हो धुंद ।।
कधी न हो ऐक्य तयांमध्ये, नित्य ते झगडती । शत्रुला मात्र हल्ला करण्या, संधी ते देती ।।
हल्ला करूनि युद्ध जिंकिले, काकतीय राजाने । साम्राज्य आपुले वाढविले हळू हळू त्याने ।।
युद्ध जिंकिले परी, शमविले किती जीव त्यांनी । महत्त्व वाढले सरदाराचे, दिली आहुति प्राणांनी ।।
भरती करण्या नव सैन्याची पेदापल्ली राजूने । द्यावी आम्हा तरुण मुले ती आदिवासी जनतेने ।।
सैन्यामाजी गेले होते, जे आदिवासी तरुण । मृत्युने त्यांच्या होय कितीतरी नुकसान ।।
दुःखी होते जन सारे होते शोकसागरी बुडाले । त्यात मागणी सरदाराची खंडणी अन् तरुण मुले ।।
विरोध करिती गावकरी ते, सरदाराच्या मागणीला । न देऊ आम्ही आता तरुण मुले वा खंडणीला ।।
भीतीने घेरले मना ते अस्वस्थ नि अशांत । काय करावे आता, उडे खळबळ चित्तात ।।
विरोधाची आग जरी, भडकेल चोहीकडे । असंतोषही पसरेल की तसाच जिकडे तिकडे ।।
शांत राहुनि लोकांसंगे, बदलावा तो विचार । बोलुनिया संगे त्याच्या, मागावा तो कर ।।
राजा प्रसन्न त्यावरी विजयश्री त्याने आणिली । म्हणुनि राजाने त्यासी बोलण्याची संमती दिली ।।
ज्येष्ठ वृद्ध आदिवासी सांगू लागले सरदारासी । दुष्काळ बहू पडला यास्तव न देऊ करासी ।।
तरुण मुले ना कोणी उरली आता आमुच्या घरात। होती ती दिली तुम्हा, कामी आली युद्धात ।।
कुठून द्यावी आता तुम्हाला मुले तरी सांगा । न टाकावा दबाव आम्हावरी निरोप राजासी सांगा ।।
मंत्री सांगे साऱ्यांना, दिला अधिकार निर्णयाचा । पेदापल्ली राजू करेल निवाडा तुमच्या प्रस्तावाचा।।
पेदापल्ली राजू सांगे साऱ्या जंगलवासियांना । पोर्णिमेपर्यंत द्यावा कर तुम्ही नकोत कारणे नाना ।।
न देता कर घुसूनि वनांतरी करू तुम्हावरी हल्ला । गर्जुनिया उच्चस्वरे तो ऐसे काही बोलला ।।
परी शांत तो पगडिड्डा राजू, तेव्हा उगा राहिला । विचारान्ती घेऊ निर्णय, साऱ्यांना सांगू लागला ।।
क्रोध नावरे लोका साऱ्या विरोध ते करिती । पेदापल्ली राजूवरती उगाच ते डाफरती ।।
त्याचवेळी शहराकडुनि जनसागर येता पाहिला । वाटते आता ते करतील सारे आपल्यावरी हल्ला ।।

## २३
## युद्धाचा थरार



लढा उभारला अन्यायाविरुद्ध जेव्हा आदिवासींनी । आश्चर्य वाटे सत्ताधीशांना तेव्हा मनोमनी ।।
लहान मुंगी लढेल का कधी शक्तिमान हत्तीशी । किंवा गांडूळ करेल का बरोबरी कधी सर्पाशी ।।
सामर्थ्य ते हत्तीचे काय ठाऊकी मुंगीला । एका पायाखाली चिरडेल तो असा कित्येक जीवांना ।।
कुठे महाल राजाचा कुठे त्याची झोपडी शुद्र । नसतेच कधी बरोबरी नृप श्रेष्ठ तो एकमात्र ।।
ऐसी अद्दल घडवू त्यांना आम्ही मिळून सारे । कधी न वाहतील मनी त्यांच्या स्वातंत्र्याचे वारे ।।
उपहास बहु दिसतसे हास्यातुनि पदोपदी राजूच्या । बंडाचा विचार न यावा आता मनी तुमच्या ।।
परत जातो माघारा आता घेऊनी सैन्याला । ध्यानी ठेवा कराल बंड तर व्हा सज्ज युद्धाला ।।
सैन्य सारे मागे फिरता सोडले तयांनी निःश्वास । शूरवीर पगडिड्डा राजू प्रमुख म्हणुनि मान्य हो साऱ्यास ।।
राजू सांगे बांधवांना न च करणे आक्रमण किल्ल्यावरी । जंगल आमचे आधार जगण्याचा हक्क सांगू त्यावरी ।।
करू तयारी युद्धाची होऊ सज्ज शक्तिनिशी । करू रक्षण जंगलचे अन् वाचवू मातृभूमीसी ।।
लाल मुंगी दंश करिता जीव हो कासावीस । करिती जे युद्ध त्यांना करू तैसाची दंश ।।
एक एक वृक्ष आपुला ठेवू या अभेद्य । मिळून सारे लहान थोर आपण जिंकूया युद्ध ।।
वृक्षावरती उंच जरा बांधू या मचाण । बसूनी त्यावरी शत्रुवरती साधू अचूक निशान ।।
शस्त्र सारे परजून ठेवू बनवू कैक बाण । अनेक युक्त्या प्रयुक्त्या ठेवा सारे आठवून ।।
करू सिद्धता युद्धाची अन् कामे घेऊ वाटून । कोणी करेल हेरगिरी तर कोणी संदेशवहन ।।
प्रार्थुनिया परमेशाला आशिष त्यांचे घेतले । पशूपक्षी मित्र त्यांचे संगती त्यानाही ठेवले ।।
येता क्षण युद्धाचा सैन्य धाडिले पेदापल्ली राजूने । घोडदळ , हत्ती अन पायदळ ते हल्ला करिती त्वरेने ।।
जिंकिन मी युद्ध अन् पराभूत ते आदिवासी । नजराणा तो जंगलातला देईन मी नृपासी।।
ऐशा विचाराने मन भारले पेदापल्ली राजूचे । छाप पाडण्या नृपावरी तो उचले पाऊल धाडसाचे ।।
सैन्य आपुले बहु प्रशिक्षित अन् सज्ज होय शस्त्राने । जंगलवासी ते काय लढतील त्यांच्या धनुष्यबाणाने ।।
शांत निवांत सैन्य त्याचे तळ ठोकूनि पठारावरी । घेत मागोवा जंगलचा जात दूर अंतरावरी ।।
दिवसभर लगबग त्यांची पठारावरी भासतसे । अंधारातूनी दूर मशाली पेटलेल्या दिसतसे ।।
निरव शांतता राती गाव सारे झोपले । संधी साधून सैनिक काही गावामध्ये घुसले ।।
हल्ला करूनि जनतेवरी बाण काही सोडले । धैर्याने तेव्हा लोकांनी तसेच ते परतविले ।।
होती शांतता भयाण ती वादळापूर्वीची । वाटे आता पडली ठिणगी की युद्धाची ।।
गावकरी मग हल्ला करिती स्वस्थ ना बसति । दिले पेटवूनि तंबू त्यांनी जेथे सैनिकांची वस्ती।।
दिला आदेश सरदाराने स्वस्थ तुम्ही ना बसावे । हल्ला करूनि त्यांच्यावरती प्रत्युत्तर ते द्यावे ।।
द्या पेटवूनि जंगल सारे पसरू दे आग । लागता धग येतील सारे आपसूकच मग ।।

## २३
## युद्धाचा थरार



दिला आदेश सरदाराने व्हा पुढे घेऊनि सैन्याला । नामोहरम करा त्यांना सैन्य पाठवू पुन्हा मदतीला ।।
संपवा सारे आदिवासी आता आठच दिवसात । गाजवा पराक्रम तुम्ही आता या युद्धात ।।
आदिवासी ते लपून छपून हल्ला करिती रातभर । गनिमी काव्याने लढत राहिले सारे ते धैर्य धुरंधर ।।
गाव सारे गिळंकृत केले जेव्हा अग्निने । लढत राहिले सारे तेव्हा असीम धैर्याने ।।
हल्ल्याला प्रतिहल्ला करू लागले ते परस्परांवर । मृत्यूला तेव्हा प्रिय झाले अनेक शूरवीर ।।
येता भास्कर डोईवरती उभे सैन्य आमने सामने । गाठ पडली ओढ्याकाठी लढू लागले निकराने ।।
युद्ध पेटले भयंकर ते भूमी हो रक्तरंजित । किती शव विखुरले इतस्ततः परिसरात ।।
पाट वाहती रुधिराचे त्या युद्धभूमीवर । तांडव चाले मृत्यूचे ते काळीज कापे थरथर ।।
स्मरूनिया निज मातेला लढू लागली सरक्का ती । संगे होता गोविंद राजलु शूर तिचा पती ।।
पती पत्नी दोघे मिळूनि लढती धैर्याने । कितीक मारिले सैनिक त्यांनी आपुल्या शस्त्राने ।।
हल्ला करूनि मंत्र्यावरती भेदिली सुरक्षा त्यांनी । बाण एक अचूक फेकला सरदाराच्या दिशेनी ।।
वेगवान तो शर पाहूनि क्षण थरकाप उडाला । स्पर्शुनी स्कंधाला तो शर वृक्षामाजी घुसला ।।
जीव वाचला सरदाराचा त्या क्षणी निश्चित । धारातीर्थी पडले तेव्हा सैनिक ते अगणित ।।
गोविंद राजू सरला मागे राखुनि प्रसंगावधान । सरक्काला मागे खेचले वाचविण्या प्राण ।।
पेदापल्ली राजू वार करितो आदिवासींवर । माघार घेतली ज्यांनी केले ते त्यांच्यावर ।।
शरामागूनि शर निघती भात्यातूनि सरक्काच्या । काळ होऊनि देही धडकती तेव्हा ते शत्रूच्या ।।
कितीक शत्रू तिने मारिले तेव्हा रणांगणी । यंत्र बनुनि कर तिचे ते शर सोडिती झणी ।।
वळता माघारा ते सावध पेदापल्ली राजू झाला । आदेश दे सैन्याला तो करा शरवर्षावाला ।।
पाठीत घुसले कैक बाण तेव्हा दोघांच्या । हिंमत न हरले ते निघाले दिशेने जंगलच्या ।।
हातात हात गुंफुनिया जखमी ते दोघे । जवळ केले मृत्यूला त्यांनी परस्परा संगे ।।
समक्कांची कन्या नागुलम्मा करी सामना शत्रुंचा । एक बाजू रक्षुनिया डंका वाजवी शौर्याचा ।।
कैक सैनिक जाती यमपुरी तिच्या तीक्ष्ण बाणांनी । लागता भाला शत्रूचा वाघीण ती उरी पेटली जखमांनी ।।
मृत्यूचे थैमान सारे कंदन पेटले रणांगणी । स्वातंत्र्याचा लढा होता पुकारलेला आदिवासींनी ।।
मुले, स्त्रिया, पुरुष अन् वृद्धही त्यात सामील । मातृभूमीचे रक्षण करण्या होते सारे बांधील ।।
भाडोत्री ते नव्हते सैनिक करिती आत्मबलिदान । प्राण देऊनि धैर्याने ते करिती मातृभू रक्षण ।।
मुले आपली पडती रणांगणी पगडिड्डा राजू पहातसे । परी त्या स्थळी भावनांना काही स्थान नसे ।।
अश्रूंना रोखुनि धरले नका येऊ डोळा । रणी झुंजतो मी धैर्य सारे करूनिया गोळा ।।
अपत्ये माझी पडली रणांगणी इतरांचीही पडली । रक्षण करण्या मातृभूमीचे लढाई आम्हीच मांडली ।।

## २३
## युद्धाचा थरार




दुःख करण्या वेळ नसे, नसे उसंत क्षणभरी । प्रबळ शत्रू उभा असे केव्हापासून दारी ।।
उन्मत्त नृप तो शक्तिमान की श्रेष्ठ आम्हापरता । दुबळे आम्ही त्याच्यापुढती पडू कधी झुंजता ।।
संपविले ज्यानी मम जन्मदात्यांचे जीवन । तेच उभे आम्हापुढती युद्धासी सरसावून।।
बदला घेण्या त्याचा घडी आली असे आज । जशास तसे उत्तर देऊ शत्रूंनो नका करू माज ।।
त्वेषाने त्याने मारिले कैक शत्रु सैनिक । तुटून पडले त्यांच्यावरतीहो होऊनिया एक ।।
पुत्र त्याचा जंपन्ना ये मदतीला धावून । त्याचक्षणी शत्रूने की धरिले त्यासी रोखून ।।
मार्ग अन्यायाचा नृप सैन्याने आचरिला । परी आदिवासी तो तसुभर ना मागे सरला ।।
लढू लागला जपन्ना एकाकी त्यांच्याशी । पाती भिडली तलवारींची गाठ पडे प्राणाशी ।।
मारिले अनेक शत्रू प्रहार केला धैर्याने । कितीक प्रेते आणुनि टाकिली वृक्षाखाली त्याने ।।
चहुबाजूने सैन्याने जेव्हा त्याला घेरले । अनेक वार तलवारीचे छातीवरती झेलले ।।
परी न फुटला पाझर त्याच्या जरा हृदयात । शव हो त्याचे घेऊनि ये क्रूरपणे हसत ।।
झाडावरती दिले टांगुनि त्याच्या देहाला। थिजल्या नेत्री बघती सारे त्याच्या क्रौर्याला ।।
पडला तो धारातीर्थी लढत लढत वीर । काळीज हलले धरतीचेही पाहूनि हे क्षणभर ।।
पाहुनिया थैमान मृत्युचे नदी किती रडली । जलाऐवजी रुधिरची की संगे घेऊनिया गेली।।



# २४
# दिव्य करंडा

युद्ध नव्हे हा मार्ग सोपा अनर्थची सारा। मृत्यूचे थैमान चालते आटतो मानवतेचा झरा ।।
पाहुनिया निष्प्रभ त्या देहांना डोळे कसे थिजले । मृत्यूचे ते भयाण गीत हृदयावरी कोरले ।।
जन्म त्याला मृत्यू सत्य असे हे शाश्वत । परी न व्हावा कधी ऐसा जीवनाचा अंत ।।
वाटले संपले सारे युद्ध आता थांबले । भास असे हा आताच की सुरू जाहले ।।
युद्ध म्हणजे केवळ विनाश करावे जीव रक्षण । देण्या युद्ध विराम हा करावे आत्मपरीक्षण ।।
येतील विचार ऐसे दृष्य सारे पाहूनि । अश्रूही येतील नयनी दुःख हो मनी ।।
परी भावना ही क्षणभरीच की टिकेल । क्षणास दुसऱ्या, नयनी सूडाची आग भडकेल ।।
मुले पडता धारातीर्थी समक्का हो सज्ज युद्धाला । प्रार्थुनिया परमेशाला जणु घेतले की अनुज्ञेला ।।
सल्ला घेतला थोरांचा अन् सूत्रे घेतली हाती । निकराचे हे युद्ध लढूया चला माझ्या सांगाती ।।
वृद्ध स्त्री अन् मांत्रिक येता पोपट टेकडीवरूनि । आशिष घेतला त्यांचा मिळून साऱ्या जणांनी ।।
विचार मांडला दोघांनी करू चर्चा राजाशी । निघतो का मार्ग काही बोलून पाहू त्याच्याशी ।।
भेट घेता पेदापल्ली राजूची वृद्धा अन् मांत्रिकाने । होता विव्हळत तो त्यावेळी अतीव वेदनेने ।।
आई म्हणुनि हाक मारितो जेव्हा तो वृद्धेला । करण्या आदर तियेचा उठून तो उभा राहिला ।।
कारण पुसता येण्याचे वृद्धा त्यासी उत्तरली । बाळा, थांबव हे युद्ध घेशील किती जीवांचे बळी ।।
द्यावे मृतदेह लेकरांचे आता तरी आम्हाला । दहन क्रिया करूनि त्यावरी करू दे कर्तव्याला ।।
द्या थोडी विश्रांती युद्धाला करूदे उत्तरक्रियेसी । करा विचार प्रस्तावाचा अन् जागावे मानवतेसी ।।
जा घेऊन मृतदेह अन् करा अन्त्य संस्कार । थांबवू युद्ध तोवरी ऐसे बोलला सरदार ।।
आणूनि साऱ्या देहांना अग्निसंस्कार मांडला । जळताना देह धूर अन् अग्नी गगनाला भिडला ।।
युद्ध कसले संहार भयंकर खच देहाचा पडला । रुधीराने की भूमीवरती रंग कसा उधळला ।।
भयाण शांतता तिथे पसरली काळीज हे गलबलले। जखमांच्या वेदनेने किती जीव कळवळले ।।
संपता बंदी युद्धाची जोश नवा भरला । तरूण वीरांनी नृप सैन्यावर हल्ला पुन्हा केला ।।
सामील होण्या सैन्यामध्ये किती तरूण येती । मुले, स्त्रिया अन् वृद्ध लोकही साथ तयांना देती ।।
आला की प्रपात जलाचा की लोळ येई अग्नीचा । येत होते सैन्य तैसे करण्या निःपात शत्रूचा ।।
तमा न त्यांना जखमांची ना भय मृत्यूचे । विचार एकच मनी त्यांच्या युद्ध हे जिकांयचे ।।
हल्ला केला ऐसा जोमाने मागे रेटती शत्रूला । उंदिर, साप, लाल मुंग्या त्यांना दिल्या की सोबतीला ।।
अनपेक्षित हल्ल्याने ते सारे गोंधळून गेले । पाहुनि नेतृत्वी समक्काला क्षणात सारे उलगडले ।।
घेऊनि आशीष परमेशाचा युद्धी ती उतरली । पराक्रमाने आपुल्या तिने किती डोकी उडविली ।।
युद्धांची बिकट स्थिती पेदापल्ली राजूने नृपासमोर मांडली । करण्या मदत त्यांना नवी कुमक धाडिली ।।



वाटेत गाठूनि सैन्याला हल्ला त्यावरी केला । समक्काने पराक्रमाचा कळस तो गाठला ।।
रणरागिणी ती, युद्धभूमी तिने गाजविली । सिंहारूढ देवी जणू युद्धभूमीत उतरली ।।
बाणामागूनि बाण सुटती तिच्या धनुष्यातूनि । चमकती बिजली भासे ती तेव्हा दामिनी ।।
फोडले द्वार सैन्याचे हल्ला केला त्यांचेवरी । एक एकास धरूनि मारिले भिडले शत्रुवरी ।।
शस्त्रे त्यांची सज्ज अन दारूगोळा अगणित । पाहुनि ते सारे निश्चय करी समक्का मनात ।।
करात धरिल्या तलवारी त्या म्यानातून काढून । करी आक्रमण त्यांच्यावरती मारिले रिपुसैन्य ।।
भाल्याने त्या मस्तक उडवी पहा रक्षकांची । अचंबित सारे होती गती पाहूनिया बाणांची ।।
वश तिला हत्ती घोडे अन् सारे होती शांत । मर्दिनीचे ते रूप पाहूनि हो सारे भयभीत ।।
कोण ही किती चपळ ही तेजस्विनी । बिजली का उतरून आली खाली गगनातुनि ।।
राहुटीत प्रधानाभोवती सज्ज होती शस्त्रे घेऊनिया । उभी राहिली त्याच्या समोरी ती तेथे जाऊनिया ।।
तडफदार ते तिचे वागणे भावले प्रधानाला । पाहूनिया रूप तिचे ते तो बोलू लागला ।
शूर तू रणरागिणी समय सूचक, अन सुंदर । रोजचेच जंगल तुजसी ज्ञात सारा परिसर ।
ठेवतो प्रस्ताव काही आज तुजसमोरी । स्वीकारूनिया त्यासी तू बुडावे सुख सागरी ।।
कोमलांगी असूनिया तू काळीज मात्र वीराचे । ऐकशील बोल माझे तर देईल पद नेत्याचे ।।
महाराज्ञी तू होशील ग काळ सुखाचा जाईल । विश्वासू मी राजाचा तुजसाठी शब्द टाकील ।।
मान्य करूनी प्रस्तावासी यावे तू राजवाड्यात । युद्ध थांबवू दो बाजूंनी नको पडू अडचणीत ।।
शब्द माझा व्यर्थ न जाईल सांगतो तुजसी । सांग मला सत्वर तू काय तुझ्या मनासी ।।
शब्द त्याचे ऐकता नयनी अंगार फुलला । बोल ऐकता तिचे स्तब्धचि क्षण झाला ।।
असेल मी सौंदर्यवती परी पतिव्रता नारी । नको गुलामी कोणाची अन् नकोच ती चाकरी ।।
तू कसला शूर तू तर भ्याड पामर । सत्तेसाठी बनला तू राजाचा चाकर ।।
करितोस चाकरी राजाची पैशासाठी तू रे । लाथ मारिते मी ऐशा वैभवावरी रे ।।
मी ना रखेल कोणाची मी तर मम पतीची । आस न मजला कधी होती ऐशा शापित वैभवाची ।।
सत्तेने मत्त तू किती जीवांना मारिलेस । मुले मारिली नेत्रासमोरी आणि मारिले पतीस ।।
परी मी न अबला मी तर सबला नारी । मृत्यूला करीन जवळी परी न ये तुझ्या दारी ।।
स्वातंत्र्य आमुचे तुम्ही घेतले आम्ही न तुमच्या दारी । मुक्त पाखरे शेतातील की नकोच पिंजरा सोन्याचा असला तरी ।।
बोलून ऐसे निघाली ती पडण्या बाहेर त्वरेने । दग्ध होय जणू तो तिच्या नेत्रातील विखाराने ।।
क्षण त्याला काहीच न सुचले तडफ तिची पाहुनिया । स्तब्ध सारे सैन्य होते बोल खडे ऐकुनिया ।।
राजाकडूनि सैन्य नवे हो दाखल मदतीला । आनंदीत ते सैन्य सारे होते त्या वेळेला ।।



भेटण्या प्रधानजींशी पेदापल्ली राजू ये राहुटीत । त्याचक्षणी पडे बाहेर समक्का वायुवेगात ।।
पाहाता तिजला शिरशिरी ये गात्री । पहातची राहिला तो विस्फरल्या नेत्री ।।

काय होते मजला नजर देई का धोका । भूतकाळ हा उभा राहिला मजसमोरी आता ।।
चित्र सरकले नजरेपुढूनि भूतकाळातील ते । बसला खाली मटकन तो सुन्न मन होते ।।

उलगडला पट सारा त्याच्या तारुण्याचा । गोड गुलाबी दिवस ते काळ होता सुखाचा ।।
होता तो आदिवासी शूर अन महत्त्वाकांक्षी खूप । प्रेम जडले त्याचे यौवना ती सुंदर मोहक ।।

होती ती तरुणी रूपसुंदरी पेदारामप्पाची नात । सापडली होती त्यांना ती मंदिर परिसरात ।।
कोणी एक स्त्री होती राजघराण्यातील सुंदरी । जन्म देऊनि कन्येला गेली ती मृत्युचे द्वारी ।।

मदनिकेसम सुंदर होती ही नवजाता । खुलत जाई सौंदर्य तिचे तारुण्य प्राप्त होता ।।
मन जडले त्याचे त्या रूपसुंदरी वरी । फूल फुलले गोड एक त्या तरुण वेलीवरी ।।

असता गर्भिणी ती वास्तव्य त्यांचे जंगलात । सुरक्षित होती ती त्याच्या आई सोबत ।।
जावे लागले अशातच त्याला एका मोहिमेवरती । घेण्या काळजी पत्नीची माता होय सोबती ।।

काळ बहु लोटला परत जेव्हा तो आला । पत्नी न दिसे त्याला न माता दिसली त्याला ।।
खिन्न हृदयी फिरत होता तो इतस्ततः । व्हावे प्रमुख सरदाराचा मनी हाच विचार होता ।।

गाठण्या ध्येय आपुले जात होता मार्गावरूनि । जे जे येतील आडवे त्याना त्या सर्वा मारूनि ।।
मारिले एक दाम्पत्य त्याने सारे त्याला आठवले । पगडिड्डा राजूचे जन्मदाते जे त्याने मारिले ।।

क्षणात उलगडला पट सारा मन बधीर झाले । वाघिणी संगे होते त्याने युद्ध एक मांडले ।।
भीतीची लहर एक गात्रे भेदून गेली । हृदयी मात्र खोल अशी जखम देऊन गेली ।।

सुन्न मनाने उठला होता जाण्या तो बाहेर । त्याच वेळी पडला एक आवाज कानावर ।।
समक्का आली समक्का आली समक्का आली । विचारांची किती आवर्ते मनी तेव्हा उठली ।।

व्याघ्रावरती स्वार होऊनि ये इकडे ती बाला । कन्याच आपुली असावी ती, काय म्हणावे दैवाला ?
माता माझी म्हणत होती असेच काहीतरी । थांबव युद्ध, उलगडतील गोष्टी तिला पाहिल्यावरी ।।

क्षमा कर बाळे मजला. मन त्याचे आक्रोशले । अनर्थ घडविला मीच, कसे हे पाप घडले ।।
क्षीण झाली गात्रे सारी मन त्याचे आक्रोशले । कसे वाचवू बाळे तुजला, काही न मजसी कळे ।।

जन्मदाता बाप जेव्हा, होतसे वैरी । नरकाशिवाय असेल का त्याला जागा दुसरी ।।
जयघोष तिच्या नावाचा बाहेर सुरू होता। मागे तिच्या, तिचा सारा आदिवासी बांधव होता ।।

वाघावरती स्वार जणू दुसरी वाघीण झाली । हाती घेऊनि तलवार नंगी पहा कशी निघाली ।।
वैद्य मांत्रिक समाज सारा होता तिच्या संगती । अंगी भरला जोश, किती रणवाद्ये वाजती ।।




गजर होय वाद्यांचा निनाद कसा घुमला । रणवाद्यांचा आवाज पहा, कसा गगनाला भिडला ।।
दृष्य होते ते भयकारी येती सारे चालून । फेकत होती अग्निज्वाळा, मशाली त्या पेटवून ।।
हाती होते अनेक शस्त्रे अन् तलवारी धारदार । वीरश्रीने भारले सारे तेचि शूरवीर ।।
चाल करूनि येती सारे शत्रुसैन्यावरी । समक्काच होती तेव्हा, त्यांची सरदार खरी ।।
भोवती तिच्या अनेक वीर शस्त्रे हाती घेऊनि । सुगंधी उद, गुगुळाच्या  धूरातुनि ये व्याघ्रारुढ होऊनि ।।
आशीष देती तिजला पशुपक्षी ही रानातील । देण्या आशीर्वचन मग चंपक नदी का मागे राहील?।।
आशीष घेऊनि साऱ्यांचे ती निघती झाली युद्धाला । पंचमहाभूतेही मग तेव्हा होती तिच्या सोबतीला ।।
शुभ्रवस्त्र लेऊनि अंगी, गळा घातली पलाशपुष्पमाला । लाल कंकणे घालुनि हाती, ल्याली हळद कुंकवाला ।।
मळवट भरला भाळी अन् सिंदूर तो भांगात । लेऊनि साज सारा, तिने शस्त्रे घेतली करात ।।
प्रधानमंत्री तो सावध होऊनि करी इशारा सैन्याला । कडे करूनि सैन्य  उभे, करण्या की रक्षणाला ।।
धीर गंभीर ती, उतरली व्याघ्रावरूनि खाली । धनुष्यावर बाण चढवूनि प्रत्यंचा तिने ओढली ।।
अग्निबाण तो सैन्यावरती जेव्हा तिने सोडला । एक नव्हे, कैक बाणांचा वर्षावचि की केला ।।
लढवूनि शक्कल तिने, बाणाग्रे तिखटाने माखली । झेलता बाण छातीवरी, शत्रूंची गाळण उडाली ।।
हतबल झाले सैन्य सारे, कडे सुरक्षेचे तुटले । ‘आक्रमण’ असा आदेश ऐकता सैन्य निकराने भिडले ।।
प्रधानमंत्री पाही तिजकडे, विस्फारित नेत्राने । अनुभव, नीती, कौशल्य सारे, विरले त्या माऱ्याने ।।
घेऊनि तलवारी दो करांमध्ये शत्रुशी ती भिडली । हल्ला करूनि त्वेषाने, किती शिरे तिने उडवली ।।
हल्ला केला प्रतिहल्ल्याला, न मारिले शरणागतांना । प्रधान मंत्री वा सरदाराला इजा केली दोघांना ।।
शत्रू तिचा होता पेदापल्ली राजू पिता तियेचा ।दैवगती पहा न्यारी, कन्या ये की घेऊनि संदेश मृत्यूचा ।।
नजरेला भिडवूनि नजर, आवेश तिचा पाहिला । तिच्या रूपाने जणू मृत्यूच सामोरी आला ।।
पाहुनि दृष्य सारे अश्रूपात तो जाहला । वृद्ध पुजारिण माता त्याची, पाणी ये डोळा ।।
पिता तिचाही रडू लागला होता त्यावेळेला ।  समक्काचाही त्याचवेळी कंठ दाटूनि आला ।।
दगड ठेवूनि काळजावरी तिने धरिले पेदापल्ली राजूला । वेलींनी बांधूनि त्याला जंगलाकडे नेला ।।
सैनिक सारे पाहती या विस्मयकारी दृष्याला । देवीच जणू माता त्यांची भास त्यांना झाला ।।
युद्धप्रसंगी युद्धभूमीवर जेव्हा पराक्रम कमी पडतो । विश्वासघात तो, अस्त्र बनूनि तेव्हा पुढे येतो ।।
सैन्याने त्याच्या हल्ला चहुबाजूंनी चढविला । घेरले तिला नी सैन्याला शस्त्रांचा मारा केला ।।
हल्ला चढविला तिच्यावरती फेकले की अस्त्र । वार केला पाठीमागून मोडले युद्ध नीतीशास्त्र ।।
जखमांनी काया तिची संपूर्ण झाकोळली । जखमेसाठी आता जागा न देहावरी राहिली ।।
तशीच निघाली जंगलदिशी ती वीरबाला । स्वरुधिरने अभिसिंचित होती ती भूमातेला ।।



सांडले रुधिर ते भूमी, वृक्ष वेलीं वरतीही । रुधिरचि ने वाहून चंपक नदीही ।।
दूरवर चालत होती जेव्हा ती तिकडे । पडला होता सडा रक्ताचाच चोहीकडे ।।
उरले सैनिक सोबत घेऊनि निघाली ती जंगलात । तेव्हाच जाई दिनकर अस्ताला कीर्र पसरली रात ।।
अंधाराची घट्ट चादर जंगलाने पांघरली । सिंह, वाघ, हत्ती साऱ्यांनी पहा साद कशी घातली ।।
भयाण शांतता घेऊनि आली ती अंधारी रात । उद्विग्न मन ते काहूर माजले मनात ।।
परतावे घराकडे आता देऊ युद्धविराम । सैनिक ही घरी जाऊनि घेतील थोडा विश्राम ।।
विचार करी प्रधानमंत्री असाच तो काही । विस्मरणात जाऊ दे सारे, युद्धाला अंत नाही ।।
करू युद्धविराम अन् मिटवू हा कलह । कितीक गेले जीव या युद्धापायी नाहक ।।
जखमा भरल्या देही समक्का गेली गावाला । काही वृद्ध अन् तरुण सैनिक घेऊनि सोबतीला ।।
कलेवर ते जंपन्नाचे आणू शोधून जंगलातुनि । करू संस्कार त्यावरी अन् देऊ त्यासी अग्नी ।।
आणिक काम एक करणे आहे आपणासी । पोपट टेकडीकडे जाऊनि भेटू वृद्ध स्त्रीसी ।।
गमविले तिने निज पुत्र या युद्धापायी । सांत्वन करू या तिचे ती होती त्याची आई ।।
क्रोध भरला राजाप्रती खूप तिच्या मनात । शापिले त्याचक्षणी तिने तेव्हा राजाप्रत ।।
ज्या साम्राज्याच्या हव्यासापायी केलेस तू युद्ध । नष्ट होईल तेच राज्य की शापिते मी तुज ।।
न राहतील सैनिक कोणी, ना कोणी सरदार । वंशवेल ही तुझीच आता इथेच की सुटणार ।।
आले होते ज्याच्यासाठी मी कार्यभाग तो संपला । मी आता निघते करण्या जवळ मृत्यूला ।।
हाक मारिता तिने व्याघ्र उभे तिजसामोरी । स्कंधावरती धनुष्य घेऊनि स्वार ती त्यावरी ।।
भाले अन् तलवार तिने हाती तेव्हा घेतली । जंगलाकडे ती निर्वाणाला की चालली ।।
निर्वाणाच्या या समयी तिच्या मागुती निघाले । जंगलप्राणी, सखे सोबती, हत्ती अन् कोल्हे ।।
चंद्रतारका निशा राणी ही तिच्या सोबत । विरून गेली समक्का तेव्हा धुक्याच्या दाट छायेत ।।
सूर्य उदयाला येता अग्नि दिला जंपन्ना देहाला । जंपन्ना वागू नाम दिधले चंपक नदीला ।।
नदीपासूनि टेकडीपर्यंत मार्ग लोकांनी न्याहाळिला । रुधिराचे थेंब दिसले बहुत त्या वाटेला ।।
समक्का न दिसली त्यांना दिसली व्याघ्रपाउले । बांगड्या अन् करंडा कुंकवाचा साऱ्यांनी ते पाहिले ।।
नाग, सर्प तयाभोवती रक्षण त्याचे करितात । दृष्य पाहता ते सारे चर्र होई काळजात ।।
समक्का न दिसता त्यांना समजले ते मनात । बांध फुटला अश्रूंचा की बुडाले शोकसागरात ।।
मनोमनी नमन करिती सारे त्या मर्दिनीला । स्त्री नव्हती देवीच साक्षात् भासे ती आम्हाला ।।
सांगू लागले लोक ऐशाच काही विचाराला । प्रतिवर्षी उत्सव करूनि स्मरतात अजुनि समक्काला ।।

धन्य ती समक्का, धन्य ती पतिव्रता नारी अन धन्य तो पराक्रम।।






శ్రీ మేడారం
Telangana Devotional
సమ్మక్క
సారమ్మ








Dr. LANKA SIVA RAMA PRASAD
M.B.B.S; M.S. GENERAL SURGERY
M.Ch. CARDIOTHORACIC SURGERY
Fellow in VASCULAR SURGERY

Post graduate Diplomate in Human Rights
Post graduate Diplomate in Television Production
Cell animation Specialist- Heart Animation Academy
Computer Animation Specialist- Pentafour- Chennai
Web Engineer and Web Designer- Web City- Hyderabad
Fellow of Indo- Asian Poetry Society

Facebook Pages:- Wordsmith; All the world is a stage;
The Regal World of Scribes; Travelogue

Address -
16-10-1294
Prasanthi Hospital
Under Bridge Road
Siva Nagar
Warangal
Telangana 506002
India

Contact -
88978 49442
83286 28381
lankasrprasad@gmail.com
www.anuvaadham.com


Dr. LANKA SIVA RAMA PRASAD (Dr. LSR Prasad) is a Cardio Thoracic and Vascular Surgeon by profession, a popular author of 120 books, cartoonist, painter, critic, Editor and orator par excellence.

His knowledge in Telugu and English earned him name. He has translated Homer's Iliad, Odyssey first time in to Telugu Literature. In that series of Greek literature- Epic Cycle and Greek Heroes came as the third book. His other notable translations in to Telugu are John Milton's Paradise Lost, Paradise Regained; John Bunyan's The Pilgrim's Progress; Virgil's Aeneid; Dante's Divine Comedy; Goethe's Faust, Rumi's Masnavi; Attar's Birds Conference; Omar Khayyam's Rubaiyat. He was assigned the job of translating selected classic poems of Telugu literature by C.P. Brown's Acadamy which was published as Telugu songs and poems. Katthi Anchupai- is a collection of noir genre stories.

More than ten translations of contemporary poets, two novels, twenty short stories, hundreds of essays and prefaces, books on science and Medicine and dream analysis are available. Now his published books have crossed the prestigious hundred land-marks and reached 120. Most of his books are reference books in literature. His poems were translated into Greek, Spanish, Arabic, Hindi, Tamil, Kannada and many other languages. His works are available free at www.anuvaadham.com

He is the recipient of Reuel International Poet Award (2017), T.S. Eliot Award (2017), Global Poet Award-CANADA-WIN (2017), Life Time Achievement Award (2017), Kibatek Medal - Turkey (2017), Poet Laureate Award-Delhi (2017), Sahiti Rajahamsa Award-Vizag (2017), Poet Laureate-Kazakisthan (2017), Pentasi-B Life Time Achievement Award (2017), Naji Naaman Award (Lebanon)- 2018, Pablo Neruda Award-( Italy)-2018 and many more honors.

He was the host and sponsor of PENTASI-B INDIA WORLD POETREE FESTIVAL-October 2017 - at HYDERABAD, INDIA, attended by more than 200 poets from all over the world.

# THE STORY OF SAMMAKKA AND SARAKKA

Somewhere in the 12th century, some tribal leaders found a new born girl (Sammakka) crying amidst tigers. The head of the tribal adopted her. This is the story of Sammakka, her husband- Pagididda Raju, a tribal chief, their children Sarakka, Nagulamma and Jampanna.

This is the story of a severe drought that lasted for years, ravaged a village, dried up the mighty Godavari River and yielded the tribal people helpless against a tribute-hungry King.

This is the story of a war fought by Sammakka, the tribal warrior and her tribe against the Kakatiya army on the banks of "Sampenga Vagu" (Jampanna Vagu).

This is the story of revenge, the curse and fall of the Kakatiya dynasty and a red orche box (A casket of Vermilion) - a story of the local deities that attracts more than ten million people to a remote area in Medaram forest, the largest bi-annual congregation of tribal communities, and perhaps in the world.

